अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिद्ध

दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.०० । अंक १८२ । बुधवार १५ एप्रिल २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 I www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'

भाग २८

## ब्रह्म बीज आणि कुंडलिनी: सृष्टीच्या आदिशक्तीचा उगम

कुंडलिनी शक्तीचे स्वरूप समजून घेण्यासाठी प्रथम सृष्टीच्या रचनेचा विचार करणे आवश्यक आहे. संपूर्ण सृष्टी ही एका विशाल वृक्षाप्रमाणे असून, ती एका 'ब्रह्म बीजा'ची अभिव्यक्ती आहे. ज्याप्रमाणे प्रत्येक बीजात अंकुरण शक्ती असते, तशीच सुप्त शक्ती या ब्रह्म बीजातही अस्तित्वात आहे. वैज्ञानिकांसाठी ही सुरुवातीला एक 'हायपोथेसिस' (परिकल्पना) वाटू शकते, परंतु अनुभवाअंती ते एक वैज्ञानिक सत्य सिद्ध होते.

जेव्हा या आदिबीजामध्ये प्रथम हालचाल झाली, तेव्हा त्यातून 'दिव्य प्रेमाचे स्पंदन' निर्माण झाले. ही केवळ भौतिक शक्ती नसून ती विचार करणारी, नियोजन करणारी आणि संपूर्ण सृष्टीवर नियंत्रण ठेवणारी एक सर्वसमावेशक शक्ती आहे. यामध्ये विद्युत आणि चुंबकत्वासारख्या भौतिक शक्तींसोबतच जागरूकतेचे स्पंदन सामावलेले आहे. यालाच आपण 'शक्ती' किंवा 'ईश्वरीय प्रेम' म्हणतो. आपल्यातील कुंडलिनी ही याच वैश्विक शक्तीचे वैयक्तिक रूप असून, ती मानवाच्या आध्यात्मिक उत्क्रांतीचा मूळ आधार आहे. अधिक माहितीसाठी : www.sahajayogamumbai.org (https://www.sahajayogamumbai.org)

## महत्त्वाचे..

### राज्यात उष्णतेची लाट; अकोल्यात सर्वाधिक ४४ अंश तापमान

पुणे : राज्यात उष्णतेची लाट पाहायला मिळत असून विदर्भात सर्वाधिक तापमान नोंद झाले आहे. अकोला जिल्ह्यात आज तापमान ४४ अंशांवर पोहोचले होते, त्याखालोखोल अमरावतीत ४३.८, सोलापूर जिल्ह्यात ४३.२ अंश तापमनाची नोंद झाली आहे. घर आणि पुणे जिल्ह्यातही ४० अंश तापमानाची नोंद झाली. त्यामुळे, उकाडा आणि कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी, राज्य शासनाने राज्य उष्णता कृती आराखडा आणि भारतीय हवामान विभागाच्या विशेषतः असुरक्षित घटकांचे संरक्षण करण्यासाठी तीन व्यापक मानक कार्यपद्धती जारी केल्या आहेत. उष्णता-संबंधित आजार व मृत्यू कमी करण्यासाठी या उपाययोजना उपयुक्त ठरणार असून, विशेषतः अनौपचारिक कामगार, खाण कामगार आणि कमी उत्पन्न गटांना मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केला.

# लोकसभेतील खासदारांची संख्या होणार ८५०

## १३१ वी घटना दुरुस्ती प्रस्तावित : महिला आरक्षण लागू होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** देशातील लोकप्रतिनिधित्व अधिक समतोल आणि व्यापक करण्यासाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. लोकसभेतील एकूण जागा ५४५ वरुन ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून यासाठी संविधान (१३१वा दुरुस्ती) विधेयक २०२६ संसदेत मांडले जाणार आहे. या प्रस्तावानुसार ८१५ जागा राज्यांसाठी तर ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. संसदीय कार्य राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या माध्यमातून हे विधेयक सादर होणार आहे.



या विधेयकामुळे लोकसभेच्या संरचनेत मोठा बदल होणार आहे. सध्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी जागांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाढत्या शहरीकरण, स्थलांतर आणि राज्यांमधील लोकसंख्येतील असमतोल लक्षात घेऊन हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

संविधान (१३१वा दुरुस्ती) विधेयकाद्वारे अनुच्छेद ८१ मध्ये बदल करण्यात येणार आहे. तसेच लोकसंख्येची नवी व्याख्या निश्चित केली जाणार असून, संसदेद्वारे मान्य केलेल्या जनगणनेनुसारच प्रतिनिधित्व निश्चित होईल. या विधेयकात डिलिमिटेशन प्रक्रियेतही मोठे बदल सूचवण्यात आले आहेत. जागांचे पुनर्निर्धारण करण्याची जबाबदारी स्पष्टपणे निवडणूक आयोगाकडे सोपवण्यात येणार आहे. २०२६ नंतरच्या जनगणनेची वाट पाहण्याची अट हटवून प्रक्रिया अधिक लवचिक करण्यात आली आहे. हा प्रस्ताव नारी शक्ति वंदन अधिनियम लागू करण्यासाठी महत्त्वाचा मानला जात आहे. या अंतर्गत लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षण लागू होणार आहे. डिलिमिटेशन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महिलांसाठी एक-तृतीयांश जागा राखीव केल्या जातील. या जागांचे रोटेशन केले जाईल आणि आरक्षणाची मुदत १५ वर्षे ठेवण्यात येणार आहे.विधेयकात अरुणाचल (पान ४ वर)

### तीन महत्त्वाच्या विधेयकांसाठी विशेष अधिवेशन

**या विशेष अधिवेशनात सरकार तीन महत्त्वाचे विधेयक सादर करणार असून, त्यामध्ये जागा वाढवण्याचा प्रस्ताव, डिलिमिटेशन विधेयक २०२६ आणि केंद्रशासित प्रदेश कायद्यात सुधारणा यांचा समावेश आहे.**

# तहसीलदारच्या चेंबरमध्ये सीसीटीव्ही बसवा, ते कलेक्टरांच्या चेंबरला जोडा

## लाचखोरीला चाप : चंद्रशेखर बावनकुळे यांचा आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** लोकाभिमुख प्रशासन निर्माण करायचं असेल तर, अधिकाऱ्यांनी लोकाभिमुख वागणं महत्त्वाचं आहे. प्रशासकीय इमारत झाली पण, टेबलाच्या खालून जर कोणी पैसे घेणार असेल तर तहसीलदार आणि एसडीएमच्या प्रत्येक कॅबीनला सीसीटीव्ही कॅमेरे लावा आणि ते कलेक्टरच्या चेंबरला सर्विलेन्सनं जोडा, अशा सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या आहेत.

लोकाभिमुख प्रशासन केवळ भाषणांनी नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून दिसले पाहिजे, असे स्पष्ट शब्दांत सांगत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावले. भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर येथे २२ कोटी रुपयांच्या खर्चातून उभारण्यात आलेल्या मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते.

प्रशासकीय इमारत उभी केली तरी टेबलाखालून पैसे घेतले जात असतील, तर त्याचा काही उपयोग नाही, असे स्पष्ट करत चंद्रशेखर बावनकुळे यांनी तहसीलदार आणि एसडीएमच्या प्रत्येक केबिनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवून ते कलेक्टर कार्यालयाशी जोडण्याचे आदेश दिले. या निर्णयामुळे महसूल विभागातील भ्रष्टाचारावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी पोलिस अधीक्षकांनाही कडक सूचना दिल्या. कोणत्याही माफियांना सोडू नका, तसेच अधिकाऱ्यांचे किंवा कर्मचाऱ्यांचे अवैध व्यवसायाशी संबंध आढळल्यास त्यांना केवळ निलंबित न करता थेट नोकरीतून बडतर्फ करण्याचा इशारा त्यांनी दिला. प्रशासन केवळ भाषणांनी चालत नाही, असे म्हणत त्यांनी अधिकाऱ्यांच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली.

प्रत्येक प्रशासकीय कार्यालयात विभाग प्रमुखांनी नागरिकांच्या भेटीसाठी ठरलेली वेळ स्पष्टपणे फलकावर लिहावी, असे निर्देशही चंद्रशेखर यांनी दिले. उद्घाटनावेळी अशी कोणतीही माहिती नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

### शेतकऱ्यांना न्याय देण्याचे आश्वासन

**धान्य उत्पादक शेतकऱ्यांना बोनस मिळावा, तसेच ज्यांची धान खरेदी झाली नाही अशा शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. गरज पडल्यास केंद्र सरकारकडेही पाठपुरावा करू, असेही त्यांनी स्पष्ट केले. समृद्धी महामार्गाच्या विकासादरम्यान भूमिहीन होणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे हे सरकारचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.**

# नेवासा आणि अकोले तालुक्यांची प्रशासकीय विभागणी!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील घोडेगाव व अकोले तालुक्यातील राजूर येथे अपर तहसीलदार नियुक्तीचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. प्रशासकीय कामकाजात सुलभता आणण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला. घोडेगाव साठी अपर तहसीलदार म्हणून सोनाली म्हात्रे यांची नियुक्ती करण्यात आली असून राजुरसाठी अधिकाऱ्याची नियुक्ती करणे अद्याप बाकी आहे.

नेवासा व अकोले हे दोन्ही तालुके क्षेत्रफळाच्या दृष्टीने व्यापक आहेत. तहसीलदारांच्या कामकाजात सुलभता येण्याच्या दृष्टीने त्याची प्रशासकीय कामकाजासाठी विभागणी करण्यात आली आहे. नेवासा तालुका विभागणीची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून आहे. सामाजिक कार्यकर्ते सुधीर वैरागर यांनी गेल्या १३ वर्षांपासून सातत्यपूर्ण पाठपुरावा करत आहेत. तालुका निर्मिती होत नसली तरी प्रशासकीय विभागणीमुळे कामकाजात सुसूत्रता येण्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी नुकत्याच काढलेल्या आदेशानुसार, १० एप्रिल २०२६ पासून सोनाली म्हात्रे या चांदा, सोनई, घोडेगाव, वडाळा बहिरोबा आणि देडगाव या महसूल मंडळांचा कारभार पाहणार आहेत. घोडेगाव परिसरातील नागरिकांची प्रशासकीय कामे सुलभ व्हावीत आणि स्थानिक विकासाला चालना मिळावी या उद्देशाने ही विभागणी करण्यात आली आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे घोडेगाव परिसरात सध्या जल्लोषाचे वातावरण असून नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

**घोडेगाव येथील नवीन कार्यालयासाठी आवश्यक असलेली ३४ एकर शासकीय जागा उपलब्ध असून, ग्रामपंचायतींचे ठराव आणि भूमी अभिलेख विभागाची प्रक्रिया आधीच पूर्ण झाली होती. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची शिफारस या कामी महत्त्वपूर्ण ठरली.**

### घोडेगावसाठी सोनाली म्हात्रे अपर तहसीलदारपदी नियुक्त; राजुर येथील नियुक्ती बाकी

# बिहारमध्ये नितीश कुमारांचा राजीनामा

## भाजपकडून मुख्यमंत्रीपदासाठी सम्राट चौधरींच्या नावाची घोषणा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पाटणा :** देशात एकीकडे ५ राज्यांतील विधानसभा निवडणुकांची लगबग सुरू असून पश्चिम बंगाल जिंकण्यासाठी भाजपचे दिग्गज नेते मैदानात उतरले आहेत. त्यातच, दुसरीकडे बिहारच्या राजकारणात बदलाचे वारे वाहत असून मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आज सकाळी ११ वाजता कॅबिनेट बैठक बोलावली होती, जी त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळातील शेवटची बैठक ठरली आहे. कारण, या बैठकीनंतर त्यांनी लोकभवन येथे जाऊन राज्यपाल महोदयांकडे आपला राजीनामा दिला. त्यामुळे, आता बिहारचा नवा मुख्यमंत्री कोण याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असतानाच भाजपने सम्राट चौधरी (पान ४ वर)

# 'समता'च्या ठेवीबाबत चाकणकरांचा खोटा जबाब : तृप्ती देसाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** प्रतिभा चाकणकर या खोटे बोलत असून त्यांनी शिर्डी पोलीसांसमोर जी साक्ष नोंदवली ती चक्क खोटी असून त्यांचे व कॅप्टन खरातचे जवळपास २३६ कॉल रेकॉर्ड मिळाले आहेत.

### कॉल चेक केल्यास पाप उघडे पडणार

त्यामुळे त्यांनी शिर्डी पोलीसांसमोर समताच्या खात्या बाबत नोंदवलेला जबाब हा खोटा असून त्या खोट बोलत असल्याचे भूमाता बिग्रेडच्या तृप्ती देसाई म्हणाल्या. मात्र तसे उघड झाल्यास प्रतिभा चाकणकर व समता आणखी अडचणीत येणार आहे. (पान ४ वर)



### चाकणकरांच्या वकील राष्ट्रवादी पुरस्कृत?

तृप्ती देसाई यांनी प्रतिभा चाकणकर यांच्या समवेत गेलेल्या वकील या राष्ट्रवादी पुरस्कृत असल्याचे आहेत आरोप केला आहे. त्यांच्या वकील जयश्री काळे - पालवे या आयोगाच्या सदस्य आहेत. त्यांना असे खासगी वकिली करता येत नाही. याला पुष्टी मिळाली असून प्रतिभा यांची मैत्रीण व वकील काळे या राष्ट्रवादी पक्षाच्या गुलाबी रंगाचा पेहराव होता. प्रतिभा यांची गुलाबी रंगाची साडी होती तर त्यांच्या मैत्रणीची साडी गुलाबी रंगाचीच होती. वकील काळे यांनी पांढऱ्या रंगाच्या टॉपवर गुलाबी रंगाची ओढणी परिधान केली होती. यावरून त्या राष्ट्रवादी पुरस्कृत या वक्तव्याला पुष्टी मिळाली आहे.

# मयूर पटारेंसह आठ जणांवर गुन्हा

## वाचनालयाच्या जागेवरून वाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती निमित्ताने वाचनालयाच्या जागेवरून जातीय तेढ निर्माण होऊन अखेर मयूर अशोकराव पटारे, सागर भगवान गायकवाड व त्यांचे साथीदारांवर अॅट्रॉसिटी अॅक्ट प्रमाणे श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी अनिता नाथा तडके यांनी सविस्तर माहिती देताना म्हटले आहे की, मी वरिल ठिकाणी आई-शांताबाई व बहिण मनिषा असे आम्ही एकत्र कुटुंबात राहत असुन आम्ही मोलमजुरी करून आमचे कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.दि. १३ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता अनिता तडके व गावातील राणी रणनवरे, रेखा जाधव, रेखा रणनवरे, नंदा रणनवरे , सविता रणनवरे , प्रमिला आहेर, मिना साबळे, शंकर रणनवरे , प्रकाश रणनवरे , शिवा साठे व ईतर असे आम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंतीनिमित वाचनालय करायचे असल्याने महाराष्ट्र बैंक शेजारी एक रूम रिकामी असल्याने आम्ही साफ सफाई करत होतो. तेथे मयुर पटारे, सागर गायकवाड व त्याचे सोबत सहा - सात जण चार चाकी गाडीतुन आले. त्यातील मयुर पटारे हा म्हणाला की, तुम्ही येथे साफसफाई करायची नाही.

येथे महारांना जागा नाही, असे म्हणुन जातीवाचक शिवीगाळ केली. त्यावर उत्तर देत 'आम्ही येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वाचनालय सुरु करणार आहे. त्यासाठी टाकळीभान ग्रामपंचायत यांची परवानगी आणली आहे. असे सांगितले असता त्यावर, तुमची जागा गाया बाहेर आहे. तुम्हाला उद्या दाखवतो मी काय आहे. असे म्हणुन त्याने व त्याचे सोबत असलेल्या ईतर इसमांनी साफसफाई करत असलेल्या या महिलांना धक्काबुक्की करुन त्याचे हातातील गावठी कट्टया सारखे हत्यार दाखवुन व चाकु दाखवुन धमकी दिली. तुम्ही येथे वाचनालय सुरु केले तर तुमचा बेत पाहु. असे म्हणुन त्याने अनिता तडके या महिलेची साडी ओढून विनयभंग व मारहाण केली.

या भांडणात राणी रन्नवरे हिचे गळ्यातील मंगळसुत्र गहाळ झाले. या सर्व प्रकारावरून श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशनमध्ये अनिता तडके यांनी सविस्तर फिर्याद दिली आहे. यावरून मयूर पटारे, सागर गायकवाड व त्यांच्या साथीदारावर अॅट्रॉसिटी अंतर्गत इतर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याचा पुढील तपास डीवायएसपी देवदत्त भवार करीत आहे.

# अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांवर खंडणीचा गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अकोला :** जिल्ह्यात गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या स्टोन क्रशर व्यवसायिक आणि अतिरीक्त जिल्हाधिकारी यांच्यातील वादात अखेर अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड याांच्याविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, गुन्हा दाखल होताच त्यांना तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलंय. गायकवाड यांच्याविरुद्ध गुन्हा नं. २७०/२०२६ कलम ३०८ (२), ३५१ (१) भारतीय दंड संहिता सहकलम ७ पीसीए नुसार खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्टोन क्रेशर उदयोजक विवेक प्रभाकर बिजवे (वय ६२) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. फिर्यादी विवेक बिजवे हे स्टोन क्रशरचा व्यवसाय करत असून १९ मार्च २०२६ रोजी त्यांचे स्टोन क्रशरच्या ठिकाणी, बार्शी टाकळी येथे बिके चौक चखृउ ३ येथून जात असताना आरोपी प्रमोद गायकवाड यांनी बिजवे यांच्याकडे १५००० रुपयांच्या खंडणीची मागणी केली. तसेच इतर सदस्यांकडूनही १५,००० रुपयांची मागणी केल्याचा आरोपी फिर्यादीत करण्यात आला आहे. जर मला पैसे दिले नाहीत तर तुमचे व्यवसाय बंद पाडील, अशी धमकी देखील गायकवाड यांनी दिली. त्यामुळे, तक्रारदाराने आरोपीस शासकिय निवासस्थानी जाऊन १५ हजार रुपये दिले. त्यानंतर १ एप्रिल २०२६ रोजी आरोपीने फिर्यादीस फोन करून मी तुम्हाला पाहून घेतो, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीने तक्रारीत म्हटलं आहे. त्यानुसार, फिर्यादीच्या जबाबावरुन गुन्हा दाखल करण्यात आला. या संदर्भात एक ऑडिओ क्लिपपुरावा म्हणून सादरही करण्यात आलाय. ९ दिवसांच्या चौकशीनंतर पोलिसांनी ही कारवाई केलीय. दरम्यान, गायकवाड यांनी सर्व आरोप फेटाळले असून आपण केवळ रॉयल्टी वसुलीसाठी दबाव टाकल्याचा दावा त्यांनी केला आहे.


### सक्तीच्या रजेवर पाठवण्याचा सरकारचा निर्णय

# नेस्को 'म्युझिक कॉन्सर्ट'ने घेतला दोन विद्यार्थ्यांचा बळी


## नशेचा ओव्हरडोस : ८० टक्के तरुणाई नशेच्या धुंदीत! | कल्याणमधून मुख्य पेडलरला सहा जणांना बेड्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** स्वप्नांच्या मुंबईत उच्चभ्रू वर्गातील तरुणाई ज्याला 'लाईव्ह कॉन्सर्ट' आणि 'म्युझिक फेस्ट' समजून थिरकत होती, तिथे प्रत्यक्षात मृत्यूचे तांडव सुरू असल्याचे समोर आले आहे. गोरेगावच्या नेस्को सेंटरमध्ये आयोजित इटालियन '९९९९९९९९' टेक्नो डीजे कार्यक्रमात ड्रग्जच्या अतिसेवनामुळे दोन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. धक्कादायक बाब म्हणजे, या कार्यक्रमात उपस्थित असलेल्या ३ ते ४ हजार विद्यार्थ्यांपैकी सुमारे ८० टक्के विद्यार्थी नशेच्या विळख्यात होते, अशी प्राथमिक माहिती समोर आल्याने मुंबई हादरली आहे. या घटनेनंतर मुंबई पोलिसांनी युद्धपातळीवर तपास चक्रे फिरवली. या हाय-प्रोफाईल पार्टीत ड्रग्ज पुरवणारा मुख्य पेडलर आनंद पटेल याला पोलिसांनी कल्याणच्या वायले नगर परिसरातून पहाटे साडेपाच वाजता ताब्यात घेतले. अटकेच्या वेळी आनंदने बराच वेळ दरवाजा उघडला नाही, मात्र पोलिसांनी कसरत करून त्याला बेड्या ठोकल्या. आतापर्यंत नेस्कोचे कर्मचारी, आयोजक आणि (पान ४ वर)



### काय आहे हे 'टेक्नो' कल्चर?



**इटलीची 'नाईन टाईम्स नाईन' ही जोडी 'हार्ड टेक्नो' आणि 'अॅसिड टेक्नो' संगीतासाठी प्रसिद्ध आहे. डीजे मशीन आणि ड्रम मशीनच्या सहाय्याने वाजवला जाणारा वेगवान 'रिदम' तरुणांमध्ये प्रचंड ऊर्जा निर्माण करतो. मात्र, याच उर्जेचा फायदा अमली पदार्थ तस्कर घेतात. अशा संगीताच्या तालावर ड्रग्जची झिंग अधिक गडद होत असल्याने, 'रेव्ह' आणि 'क्लब' कल्चरच्या नावाखाली अशा पार्ट्या आता मृत्यूचे सापळे बनत आहेत.**

## संपादकीय

# नारीशक्तीचे राजकारण

संसद आणि राज्य विधिमंडळांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याची तरतूद असलेले 'नारी शक्ती वंदन' विधेयक हे भारतीय लोकशाहीच्या प्रवासातील एक ऐतिहासिक आणि प्रागतिक पाऊल आहे. सामाजिक समता आणि कायदेमंडळातील स्त्री-शक्तीचा सहभाग वाढवण्यासाठी अशा प्रकारच्या आरक्षणाची दीर्घकाळापासून प्रतीक्षा होती. जेव्हा सप्टेंबर २०२३ मध्ये सरकारने हे घटनादुरुस्ती विधेयक मांडले, तेव्हा त्याला मिळालेला सर्वपक्षीय पाठिंबा हे या विषयाचे गांभीर्य दर्शवणारे होते. मात्र, आज जेव्हा या कायद्याच्या अंमलबजावणीची वेळ जवळ येत आहे, तेव्हा हे पवित्र पाऊल सकारात्मक वातावरणात पडण्याऐवजी राजकीय डावपेचांच्या चिखलात अडकताना दिसत आहे. लोकशाहीत सहमती आणि संवाद हे मुख्य आधारस्तंभ असतात, परंतु 'नारी शक्ती वंदन कायद्या'च्या अंमलबजावणीच्या बाबतीत याच विचारविनिमयाचा अभाव प्रकर्षाने जाणवत आहे.

कोणत्याही मोठ्या सामाजिक बदलासाठी विरोधकांना विश्वासात घेणे हे निरोगी लोकशाहीचे लक्षण असते. मात्र, केंद्र सरकार सध्या या विषयाला राजकीय शक्तिप्रदर्शनाचे साधन बनवू पाहत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. संसदेचे विशेष अधिवेशन बोलावून एकीकडे नारीशक्तीचा गौरव करायचा आणि दुसरीकडे विरोधकांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करायचे, हा प्रकार लोकशाहीशी सुसंगत वाटत नाही. या कायद्यात अनुसूचित जाती आणि जमातींच्या महिलांसाठी आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली असली, तरी इतर मागासवर्गीय (ओबीसी) महिलांच्या आरक्षणाचा मुद्दा अद्याप अधांतरी आहे. राहुल गांधी यांच्यासह संपूर्ण विरोधी पक्षाने जातीनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली होती, जेणेकरून ओबीसींचा अधिकृत आकडा समोर येईल आणि त्या प्रमाणात त्यांना आरक्षण देता येईल. सुरुवातीला या मागणीला 'अर्बन नक्षलवाद' ठरवणाऱ्या सरकारने आता आपला पवित्रा बदलला असला, तरी त्यामागील हेतू केवळ राजकीय तडजोड आहे की सामाजिक न्याय, हा प्रश्न कायम आहे.

महिला आरक्षणाची अंमलबजावणी ही जनगणनेच्या आधारे होणाऱ्या मतदारसंघांच्या पुनर्रचनेवर अवलंबून आहे. १ एप्रिलपासून सुरू झालेली ही प्रक्रिया २०२७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. जनगणनेतून ओबीसींचा अधिकृत आकडा समोर आल्यावर महिला आरक्षणात त्यांच्यासाठी जागांची तरतूद करावी लागेल. तसे झाल्यास खुल्या प्रवर्गातील जागा कमी होतील, हा पेच सरकारसमोर आहे. हा तिढा सोडवण्यासाठी सरकारने २०११ च्या जनगणनेचा आधार घेण्याचा जो नवा पवित्रा घेतला आहे, तो अधिक वादग्रस्त ठरू शकतो. जुन्या जनगणनेच्या आधारे सरसकट ५० टक्के जागा वाढवण्याचा प्रस्ताव मांडला जाण्याची शक्यता आहे. अशा प्रकारची वाढ लोकसंख्येच्या वास्तवाकडे दुर्लक्ष करणारी ठरेल आणि यामुळे प्रादेशिक असंतुलन निर्माण होईल.

मतदारसंघांची पुनर्रचना हा विषय दक्षिण भारतातील राज्यांसाठी अत्यंत संवेदनशील आहे. तमिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश यांसारख्या राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणात प्रभावी काम केले आहे. आता केवळ लोकसंख्येच्या आधारे लोकसभेच्या जागा ठरल्या, तर या राज्यांचे संसदेतील संख्याबळ उत्तर भारताच्या तुलनेत कमी होईल. म्हणूनच दक्षिणेकडील राज्यांची मागणी आहे की, लोकसंख्येसोबतच दरडोई उत्पन्न आणि विकास निर्देशांक यांसारख्या घटकांचाही विचार व्हावा. सर्व राज्यांशी चर्चा न करता आणि त्यांना विश्वासात न घेता घेतलेला कोणताही निर्णय फेडरल स्ट्रक्चरला (संघराज्य रचनेला) तडा देणारा ठरेल.

विशेष म्हणजे, हे घटनादुरुस्ती विधेयक संमत करण्यासाठी संसदेत दोन-तृतीयांश बहुमताची गरज आहे. सध्याच्या आकडेवारीनुसार, २९३ खासदारांच्या बळावर मोदी सरकारला ३६२ हा बहुमताचा आकडा गाठण्यासाठी २३९ खासदार असलेल्या 'इंडिया' आघाडीची मदत अनिवार्य आहे. अशा स्थितीत सहमतीचा मार्ग निवडण्याऐवजी विशेष अधिवेशनाचा घाट घालणे, हे राजकीय डावपेचांचा भाग वाटते. पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूमध्ये निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचलेला असताना विरोधी खासदारांना संसदेत गुंतवून ठेवणे, हा प्रचारातील सहभाग खंडित करण्याचा प्रयत्न असू शकतो का? असा प्रश्न उपस्थित होतो. 'सबका साथ, सबका विकास' ही घोषणा केवळ निवडणूक प्रचारपुरती मर्यादित न राहता, ती प्रत्यक्ष व्यवहारात दिसायला हवी. महिलांना कायदेमंडळात आरक्षण मिळणे हे स्वागतार्हच आहे, पण ते देताना कोणताही समाज किंवा कोणतेही राज्य स्वतः वर अन्याय झाल्याची भावना मनात बाळगून राहणार नाही, याची काळजी राज्यकर्त्यांनी घ्यायला हवी. विरोधकांनी मागणी केलेली सर्वपक्षीय बैठक हा या पेचावरचा सर्वात सोपा आणि लोकशाही मार्ग आहे. जर सरकारने खऱ्या अर्थाने नारी शक्तीला 'वंदन' करायचे ठरवले असेल, तर ते राजकारणाच्या चष्म्यातून न बघता सर्वसमावेशक न्यायाच्या भूमिकेतून बघायला हवे. लोकशाहीत लादलेले निर्णय टिकत नाहीत, तर विचारविनिमयातून साधलेली सहमतीच देशाला प्रगतीकडे नेते.

# भीम जयंतीनिमित्त नेवासे तालुक्यात आवतरले निळे वादळं

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी.जयंती मंगळवार (दि.१४ एप्रिल) रोजी नेवासा शहरासह तालुक्यात मोठ्या धूमधडक्यात आणि उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली देशात समता प्रस्थापित करण्यासाठी उभे आयुष्य खर्ची घालणाऱ्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करतांना आणि त्यांना अभिवादन करण्यासाठी तालुक्यातील विविध राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रासह तळागाळातील सर्वसामान्य जनता आणि भीम सैनिकांनी डॉ.आंबेडकरांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

नेवासा शहरातील नगरपंचायत चौक नेवासा पंचायत समिती चौकात तसेच बसस्थानक परिसरासह ठीक ठिकाणी शहरासह तालुक्यात भीम जयंती उत्सव मोठ्या जल्लोष्यात साजरा करण्यात आला भीम जयंतीनिमित्त शहरासह तालुक्यात सर्वत्र निळे वादळ निर्माण झालेले होते तर नेवासे फाटा येथील आंबेडकर चौकात भीम जयंतीनिमित्त न्यू फ्रेंड्स कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ तसेच व्यापारी असोसिएशनच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते तर डॉ.आंबेडकरनगर वसाहतीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुर्णाकृती पुतळा भीम जयंतीचे औचित्य साधून उभारण्यात आलेला असून आंबेडकरनगर येथेही त्यामुळे भीम जयंती उत्सव मोठ्या धूमधडक्यात साजरा करण्यात आला.

राज्याचे माजी मंत्री शंकरराव गडाख,आमदार विठ्ठलराव लंघे - पाटील यांनी स्वतंत्रपणे भीम जयंतीनिमित्त विविध ठिकाणी हजेरी लावून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले नेवासे शहरात अड.संजय सुखधान यांनी तर नगरपंचायत चौकात वंचित बहुजन आघाडीच्यावतीने जयंती साजरी करण्यात आली तर नेवासे फाटा येथे भीम जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले आणि घटनापती प्रतिष्ठानच्यावतीने भीम जयंती उत्सव साजरा करण्यात आला डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सर्वत्र निळे वादळ निर्माण होऊन सर्वत्र अभिवादन सोहळा उत्साहाच्या वातावरणत संपन्न झाला याप्रसंगी लोकनियुक्त सरपंच सतिश निपुंगे,माजी सरपंच विजुभाऊ गाडे,कानिफनाथ कराडे,अड अशोक करडक, घटनापती प्रतिष्ठानचे रवि भालेराव,अड सुदाम ठुबे,सुनील वाघमारे,गणपत मोरे,नगरसेवक कृष्णा परदेशी,अमोल घुले, संजय निपुंगे,संतोषमामा निपुंगे,मराठा सुकाणू समितीचे गणेशभाऊ झगरे,पत्रकार राजेंद्र वाघमारे,बादल परदेशी यांच्यासह भीम सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## डॉ. आंबेडकरांचे विचार केंद्रस्थानी ठेवून कार्य केल्यास निश्चित प्रगती : शंकरराव गडाख



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार चिरंतन प्रेरणादायी असून त्यांच्या विचारांचा अवलंब करून कार्य केल्यास निश्चित प्रगती साधता येते, असे प्रतिपादन माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी केले.

नेवासा शहरातील घटनापती प्रतिष्ठान तसेच नेवासा फाटा येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित विविध कार्यक्रमांना भेट देऊन त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सांगितले की, डॉ. आंबेडकर यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिल्यामुळे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले आणि समाजात मोठा सकारात्मक बदल घडून आला.

नेवासा तालुक्यातील गावागावांत तरुण पिढी एकत्र येऊन सामाजिक उपक्रम, रक्तदान शिबिरे आणि विविध जनहिताचे कार्यक्रम आयोजित करत असल्याचे त्यांनी कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे समाजात एकजूट निर्माण होत असून, ही बाब अत्यंत प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी नमूद केले.तसेच, डॉ. आंबेडकर यांचे साहित्य हे नव्या पिढीसाठी अभ्यासाचे केंद्र असून त्यांच्या विचारांचे आचरण केल्यास समाज अधिक सक्षम आणि प्रगत होईल असा विश्वासही गडाख यांनी व्यक्त केला.यावेळी नेवासा शहर व नेवासा फाटा परिसरातील नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रवादी किसान सभा जिल्हाध्यक्षपदी राजेंद्र कोकणे यांची निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

टाकळीभान: श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील प्रगतशील शेतकरी राजेंद्र नानासाहेब कोकणे यांची राष्ट्रवादी किसान सभा अहिल्यानगर उत्तर विभाग जिल्हाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे.

राजेंद्र कोकणे यांचे शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्याची पद्धत शेतकऱ्यांसाठी केलेले विविध आंदोलने, शेतकरी बांधवांप्रती असलेली असलेली तळमळ याची दखल घेऊन त्यांना निवड पत्र देण्यात आले. त्यांना वरिष्ठ उपाध्यक्ष व प्रभारी सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र राज्य माजी आ. लहू कानडे यांच्या हस्ते नुकतेच निवड पत्र प्रदान करण्यात आले. त्यांच्या या निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष (अजित पवार गट) व महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार , राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रभारी सामाजिक न्याय विभाग राष्ट्रवादी काँग्रेस माजी आ. लहू कानडे ,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभा प्रांत अध्यक्ष ॲड वसंतराव मनकर , शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड अजित काळे,अहिल्यानगर शेतकरी संघटनेचे प्रभारी व प्रवक्ते प्रा. कार्लस साठे, प्रा.जयकर मगर, बंडोपंत बोडखे, श्रीधर गाडे,सचिन जगताप, सतीश बोर्डे , अशोक भोसले, भैय्या शहा, नानासाहेब रेवाळे, सागर मुठे, रमेश आव्हाड, दादासाहेब कापसे, आबासाहेब रणनवरे, बापूसाहेब शिंदे,गजानन कोकणे, बंडू कोकणे, अनिल कोकणे, काका डिके ,भाऊराव कोकणे, सुभाष पटारे, विशाल पटारे, मधुकर गायकवाड ,बाबासाहेब तनपुरे, दत्तात्रय मगर ,सुरेश पवार, सुरेश गटकळ, विश्व धावपटू भाऊसाहेब गव्हाणे, रामनाथ माळोदे, अरविंद साळवे आदींनी अभिनंदन केले आहे. या निवडीबद्दल कोकणे यांचे गावातील मान्यवर, पदाधिकारी व शेतकरी बांधव ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष व महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या पक्षाची ध्येय धोरणे, सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी व शेतकऱ्यांच्या जीवनात सुख-समृद्धी येण्यासाठी राष्ट्रवादी किसान सभा मजबूत करण्याचे प्रयत्न केले जाईल. **राजेंद्र कोकणे**



# ऑरगॅनिक खते वापरणे ही काळाची गरज : नानासाहेब पवार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान:** शेतकऱ्यांनी ऑरगॅनिक खते वापरणे ही काळाची गरज असून त्यापासून मिळणारे उत्पादन हे शरीरासाठी लाभदायक असते असे प्रतिपादन माजी सभापती नानासाहेब पवार यांनी केले. के. एन एस फर्टीलायझर कंपनी ने शेतकऱ्यांसाठी आपल्या प्रॉडक्टच्या माहितीबद्दल मार्गदर्शन शिबीर आयोजित केले होते. यावेळी पवार बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अशोकचे कारेगाव भागचे संचालक शिवाजीराव शिंदे, अशोकचे संचालक यशवंतराव रणनवरे, शेतकरी बाबासाहेब तनपुरे ,भाऊसाहेब पटारे आदी प्रमुख उपस्थित होते.

याप्रसंगी के.एन एस फर्टीलायझर कंपनीच्या मुख्य कार्यकारी अंजू नय्यर यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले व कंपनीच्या प्रॉडक्ट बद्दल माहिती दिली. के एन एस या अग्रगण्य कृषी तंत्रज्ञान व शाश्वत शेती उपाय देणाऱ्या कंपनीने आज सुमारे ५० शेतकऱ्यांसाठी श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान ग्रामपंचायत येथे एक विशेष मार्गदर्शक सत्र आयोजित केले. या सत्रात कंपनीच्या मुख्य कार्यकारी श्रीम.अंजू नय्यर यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत मातीच्या आरोग्याचे महत्त्व आणि आधुनिक शेतीतील बदल यावर सखोल मार्गदर्शन केले.

या सत्रातील प्रमुख आकर्षण म्हणजे के एन एस च्या टेरेस प्रो. या अनोख्या ग्रॅन्युल उत्पादनाविषयीचे सादरीकरण. श्रीमती नय्यर यांनी अत्यंत सोप्या भाषेत टेरेस प्रो. चे वैशिष्ट्ये, त्याची कार्यपद्धती आणि दीर्घकालीन फायदे समजावून सांगितले. त्यांनी कोणत्याही प्रकारचा आक्रमक विक्रीचा दृष्टिकोन न ठेवता, शेतकऱ्यांना ज्ञान देण्यावर भर दिला. याप्रसंगी के एन एस कंपनीच्या मुख्य कार्यकारी अंजू नय्यर यांनी शेतकऱ्यांसोबत शेतकऱ्यांचे प्रश्न जाणून घेत त्यांच्याशी संवाद साधला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्जुन राऊत यांनी केले तर संतोष कांबळे, ब्रह्मा शिंदे, महेश्वरी शिंदे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.




## हनुमंतगावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** राहाता तालुक्यातील हनुमंतगाव येथे भीमतेज युवक मित्रमंडळ व समस्त ग्रामस्थ यांच्या संयुक्त प्रयत्नातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद शाळा हनुमंतगाव व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भालेरायवाडी येथील विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनावर प्रभावी भाषणे करत समूह भीमगीते सादर केली. त्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमास प्रवरा बँकेचे माजी संचालक किसनराव कोतकर, प्रवरा कारखान्याचे संचालक अशोक घोलप, एकलव्य सेनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे, माजी सरपंच गोरक्षनाथ ब्राम्हणे, जनसेवा कार्यालयाचे प्रदीप गाडेकर, सरपंच मनीषा माळी, उपसरपंच प्राजक्ता अनाप यांसह ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन निलेश ब्राम्हणे यांनी केले तर आभार बाळासाहेब ब्राम्हणे यांनी मानले.



## पोहेगांवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** तालुक्यातील पोहेगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले.भाजपाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, कोल्हे कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांनी रमाईमाता नगर येथे येथील डॉ. आंबेडकर स्मारकास पुष्पहार अर्पण करत सर्वांना शुभेच्छा दिल्या. शांतता, सलोखा व प्रगतीचा मार्गावर चालण्यासाठी सर्वांनी प्रार्थना केली.

यावेळी सहकार महर्षी शंकरराव कोल्हे कारखान्याचे संचालक ज्ञानदेव औताडे, माजी संचालक अशोक औताडे, संजय औताडे, राजेंद्र औताडे,बापुसाहेब औताडे,आप्पासाहेब औताडे, रमेश औताडे, चंद्रकांत औताडे, शंकरराव औताडे, विलास रोहमारे, बाळासाहेब औताडे, सुखदेव भालेराव, रामदास भालेराव, नवनाथ औताडे ,विठ्ठल औताडे ,इंद्रभान खुरसने ,कृष्णा औताडे, नितीन चौधरी ,नितीन गव्हाणे अदी उपस्थित होते.आभार राजेंद्र औताडे यांनी मानले.



## संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानला भाविकांकडून ३१ क्विंटल धान्यदान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** वरुथिनी वद्य एकादशीच्या निमित्ताने नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानसाठी वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांनी केलेल्या आवाहनानुसार काही गावातील भाविकांनी ३१ क्विंटल धान्य दान केले.या दात्यांचे भाविकांनी कौतुक केले संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांच्या संकल्पनेतून मंदिर परिसरात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या उपक्रमांना भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.मंदिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण सेवा देण्याचा उपक्रम ही राबविण्यात येत असून शिक्षण घेत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी मंदिर प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे. या सेवाभावी कार्याला बळ मिळावे या उद्देशाने गुरुवर्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांनी काही गावांना धान्यदानाचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत तरवडी,सुदामपूर, कुकाणा आणि भेंडा येथील ग्रामस्थांनी वद्य एकादशीच्या निमित्ताने तब्बल ३१ क्विंटल गव्हाचे धान्य संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर येथे अर्पण केले.ग्रामस्थांच्या या सेवाभावी योगदानाचे मंदिर समिती आणि बाबाजी यांनी विशेष कौतुक केले. यावेळी गुरुवर्य देविदास महाराज म्हस्के व अध्यक्ष पांडुरंग अभंग व विश्वस्त मंडळींनी सर्व ग्रामस्थांचा सत्कार करून, माऊली सेवेकऱ्यांनी यापुढेही अशाच प्रकारे समाजोपयोगी आणि सेवाभावी उपक्रमांत सहभागी व्हावे अशी भावना व्यक्त केली. या उपक्रमामुळे धार्मिक श्रद्धेबरोबरच समाजसेवेचा संदेशही अधिक दृढ झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



## विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञान, स्वाभिमान आणि परिवर्तनाचा दीपस्तंभ : मा. आ. काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी प्रतिनिधी :-** आजच्या वेगाने बदलणाऱ्या काळात, विज्ञान, तंत्रज्ञान आणि ज्ञानाच्या युगात आपण पुढे जात असतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या विचारांची जाणीव अधिक प्रकर्षाने होते.समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि विषमता दूर करण्यासाठी शिक्षण हाच सर्वात प्रभावी मार्ग आहे हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले असून भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञान, स्वाभिमान आणि परिवर्तनाचा दीपस्तंभ असल्याचे प्रतिपादन माजी आमदार अशोकराव काळे यांनी केले आहे.

महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला माजी आमदार अशोकराव काळे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले याप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ संविधानाची निर्मिती केली नाही, तर त्यांनी भारतीय समाजाला विचार करण्याची नवी दिशा दिली. शिक्षण, स्वाभिमान आणि संघटन या त्रिसूत्रीच्या माध्यमातून त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाला उभारी दिली. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा त्यांचा संदेश आजच्या तरुणांसाठी अधिकच प्रेरणादायी आहे. त्यांचे जीवन म्हणजे कठोर परिश्रम, जिद्द आणि आत्मविश्वास यांचे जिवंत उदाहरण असून त्यांच्या संघर्षातूनच आपल्याला प्रेरणा घेऊन प्रत्येक क्षेत्रात प्रगती साधण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले

यावेळी कर्मवीर शंकरराव काळे कारखाना कार्यस्थळावरील कार्यक्रम प्रसंगी पंचायत समितीचे माजी उपसभापती वाल्मिकराव कोळपे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक राजेंद्र मेहेरखांब, सुरेगावच्या सरपंच सौ.सुमन कोळपे, उपसरपंच सीमा कदम, माजी सरपंच शशिकांत वाबळे, सचिन कोळपे,पद्मविभुषण डॉ.शरदचंद्रजी पवार पतसंस्थेचे संचालक रविंद्र निकम, यशवंत निकम,अंबादास धनगर, राजेंद्र मेहेरखांब,दादासाहेब जगताप,दिलीप शरमाळे, संजय ढोणे, पत्रकार सिद्धार्थ मेहेरखांब,मोतीराम निकम, राहुल डोखे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव उपसमितीचे अध्यक्ष परसराम मेहेरखांब, उपाध्यक्ष महेश निकम, सचिव अरुण लोंढे, खजिनदार राहुल बनकर, बाळनाथ साळवे, मनोज साळवे,शिवाजी साळवे, नरेंद्र गडवे, सुभाष डोलारे, प्रवीण गायकवाड, प्रवीण मेहेरखांब,कैलास पवार आदी मान्यवर उपस्थित होते.



## म्हैसगाव- दरडगाव येथे आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**म्हैसगाव :** राहुरी तालुक्यातील म्हैसगाव व दरडगाव थडी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. श्री केदारेश्वर माध्यमिक विद्यालय, म्हैसगाव येथे आयोजित मुख्य कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात पार पडला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास मुख्याध्यापक सर्जेराव मुसळे, कणसे सर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष विलास गागरे, चागदेव चोपडे, नानासाहेब विधाटे आदी उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून डॉ. आंबेडकरांनी देशासाठी केलेले कार्य व भारतीय राज्यघटनेचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण, समता व न्याय या मूल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बाबासाहेबांच्या विचारांची ओळख करून देण्यात आली. दरम्यान, ग्रामपंचायत व भीम क्रांती मित्र मंडळाच्या वतीनेही जयंती साजरी करण्यात आली. सरपंच सुजाता पवार, उपसरपंच शिवाजी बर्डे, सदस्य व विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. मोठ्या संख्येने ग्रामस्थ व शिक्षकांनी सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली.




हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# प्रतापपूरमध्ये शासकीय गायरान जमिनीवरील अतिक्रमणाविरोधात 'उपोषणाचे हत्यार'

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील प्रतापपूर येथे शासकीय गायरान जमिनीवर झालेल्या अवैध अतिक्रमणाकडे ग्रामपंचायत प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा खळबळजनक आरोप करण्यात आला आहे. या अतिक्रमणाविरोधात धोंडीराम गंगाराम आंधळे यांनी आक्रमक पवित्रा घेत १४ एप्रिल २०२६ पासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला सुरुवात केली आहे.




या आंदोलनामुळे महसूल विभाग आणि ग्रामपंचायत प्रशासनाचे धाबे दणाणले असून, प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रतापपूर येथील शासकीय गट नंबर ३७२ ही जमीन 'गायरान' असून ती सार्वजनिक वापरासाठी राखीव आहे. या जागेवर शिवाजी रावसाहेब शिंदे यांनी अनधिकृतपणे अतिक्रमण केल्याची तक्रार आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ग्रामपंचायतीने संबंधित व्यक्तीला 'घरकुल' मंजूर करताना रेकॉर्डवर २५x२५ ची जागा दर्शविली होती. मात्र, प्रत्यक्ष जागेवर ३५x३५ चे बांधकाम करून मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण करण्यात आले आहे. याप्रकरणी तक्रारदार धोंडीराम आंधळे यांनी वेळोवेळी पुराव्यांसह प्रशासनाकडे दाद मागितली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, या अतिक्रमणाबाबत ग्रामपंचायत प्रशासनाने २ सप्टेंबर २०२५ आणि १७ सप्टेंबर २०२५ रोजी संबंधितांना नोटीस बजावली होती. मात्र, या नोटीस केवळ कागदोपत्रीच राहिल्या असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. ग्रामसेवक, सरपंच आणि इतर सदस्यांनी संगनमत करून शासनाची व ग्रामस्थांची दिशाभूल केली आहे, असा थेट आरोप आंधळे यांनी केला आहे. २०१० आणि २०११ च्या शासन परिपत्रकानुसार गायरान जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याचे स्पष्ट आदेश असतानाही, प्रतापपूर ग्रामपंचायतीने कायद्याचे उल्लंघन केल्याचे निवेदनात म्हटले आहे. तक्रारदाराने २१ जानेवारी २०२६ आणि ५ मार्च २०२६ रोजी वारंवार स्मरणपत्रे देऊनही प्रशासनाने याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले.

प्रशासनाच्या या घुमेपणामुळे आणि हुकूमशाहीमुळे सर्वसामान्य नागरिकांचा व्यवस्थेवरचा विश्वास उडाला आहे. आर्थिक हितसंबंधांतून हे अतिक्रमण वाचवले जात आहे का? असा संतप्त सवाल धोंडीराम आंधळे यांनी उपस्थित केला आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून, धोंडीराम आंधळे यांनी त्यांना अभिवादन करून १४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजेपासून बेमुदत उपोषणास सुरुवात केली. त्यांनी आपल्या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री सचिवालय, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि गटविकास अधिकारी यांना पाठवल्या आहेत.

या उपोषणादरम्यान प्रकृतीला काही इजा पोहचल्यास त्यास तत्कालीन सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक आणि कमिटी जबाबदार राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. आता या गंभीर प्रकरणी जिल्हा प्रशासन आणि संगमनेर पंचायत समिती काय भूमिका घेते आणि हे अतिक्रमण हटवले जाते का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# मुक्त विद्यापीठामुळे कौशल्याला सन्मान
## स्वयंरोजगाराला चालना : डॉ. सुधीर तांबे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** : शिक्षणापासून वंचित राहिलेल्या युवक व कारागिरांना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून शिक्षणाची नवी संधी उपलब्ध झाली असून त्यांच्या कौशल्याला शैक्षणिक मान्यता मिळणार आहे, असे प्रतिपादन जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित पूर्व शिक्षण मान्यता मूल्यांकन केंद्राच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी केंद्राचे संचालक डॉ. राम ठाकूर, डॉ. प्रकाश देशमुख, दुर्गाताई तांबे, आतिक शेख आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. तांबे म्हणाले, पारंपरिक शिक्षणाच्या चौकटीबाहेरही अनेक युवक विविध कौशल्यांत पारंगत आहेत.

मात्र प्रमाणपत्राअभावी त्यांना योग्य संधी मिळत नाही. मुक्त विद्यापीठाच्या या उपक्रमामुळे इलेक्ट्रिशियन, फिटर, प्लंबर, टेलरिंग, ब्युटी पार्लर आदी क्षेत्रातील कौशल्यांना शैक्षणिक मान्यता मिळून त्यांचा सन्मान होणार आहे. जयहिंद लोकचळवळीच्या माध्यमातून कौशल्यविकासाबरोबर स्वयंरोजगाराला चालना देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. संचालक डॉ. राम ठाकूर यांनी हा उपक्रम युवकांसाठी संधी निर्माण करणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

# निळवंडे धरणातून आजपासून पाणी सोडा : ना. विखेंचे निर्देश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : अकोले तालुक्यातील निळवंडे धरणाच्या लाभक्षेत्रातील उच्चस्तरीय आणि उजव्या कालव्यातून १५ एप्रिलपासून पाणी सोडण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. तसेच डाव्या कालव्याचे आवर्तन २५ एप्रिलपासून सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. वाढती उन्हाची तीव्रता, लाभक्षेत्रातील गावांमध्ये निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न विचारात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

उच्चस्तरीय कालव्यांवरील शेतकऱ्यांनाही या पाण्याचा लाभ मिळावा, ही मागणी मंत्री विखे पाटील यांनी संवेदनशीलतेने मान्य केली आहे. यामुळे अकोले, संगमनेर, राहाता, राहुरी आणि कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांनी नुकतीच ना. विखे पाटील यांची भेट घेऊन आवर्तन सोडण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर त्यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने नियोजित वेळापत्रकानुसार पाणी सोडण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# शिक्षण, संघटन व संघर्षाची त्रिसूत्रीच प्रगतीचा मार्ग : डॉ. पिपाडा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिर्डीत विविध कार्यक्रम उत्साहात पार पडले. समाजातील वंचित, उपेक्षित व दुर्बल घटकांच्या उन्नतीशिवाय राष्ट्राची प्रगती अपूर्ण राहते, अशी भूमिका डॉ. आंबेडकरांची होती, असे प्रतिपादन भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी केले.



कार्यक्रमाची सुरुवात लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. ममता पिपाडा यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी आरपीआयचे नेते दिलीपराव वाघमारे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. पिपाडा यांनी आपल्या भाषणात डॉ. आंबेडकरांच्या शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीचा विशेष उल्लेख केला. शिक्षण हे केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचे त्यांनी सांगितले. समता, बंधुता व न्याय या मूल्यांवर आधारित समाजव्यवस्था उभी राहणे हीच खरी राष्ट्रउन्नती असल्याचेही त्यांनी नमूद केले. बाबासाहेबांचे कार्य संपूर्ण राष्ट्रासाठी प्रेरणादायी असून प्रत्येकाने त्यांच्या विचारांचा अंगीकार करणे आवश्यक आहे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी डॉ. आंबेडकरांना अभिवादन करून त्यांच्या विचारांचे पालन करण्याचा संकल्प केला.

# डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे कृतीतून आचरण गरजेचे : विवेक कोल्हे




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कोपरगाव शहरात विविध कार्यक्रम उत्साहात पार पडले. यावेळी शिका, संघटित व्हा व संघर्ष करा हा डॉ. आंबेडकरांचा मूलमंत्र आजही प्रेरणादायी असून त्यांच्या विचारांचे कृतीतून आचरण करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन युवानेते विवेक कोल्हे यांनी केले. जयंतीनिमित्त शहरातील डॉ. आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्यास मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले. तसेच मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांच्या प्रयत्नातून उभारलेल्या वाचनालयाच्या नूतन इमारतीत कोपरगाव नगरपरिषदेच्या वतीने १० तासांचे 'स्टडी मॅरेथॉन' व भव्य ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन विवेक कोल्हे, नगराध्यक्ष पराग संधान व शिक्षण सभापती संजनाताई उदावंत यांच्या हस्ते झाले. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका पुष्पाताई काळे यांच्या हस्ते भारतीय संविधान हस्तलिखित प्रत लेखन उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. ग्रंथ प्रदर्शनात सहभागी विद्यार्थ्यांशी संवाद साधत कोल्हे यांनी जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास नगरपरिषद पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रत्येक तालुक्यात समाज भवन उभारणार : विजय चौधरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तिळवण तेली समाजाचे राज्यातील प्रत्येक तालुक्यात समाज भवन उभारले जाणार असल्याचे प्रतिपादन तिळवण तेली समाजाच्या मेळाव्यात महासभेचे महाराष्ट्र अध्यक्ष विजय चौधरी यांनी केले. श्रीरामपूर तालुका व शहर तेली समाजाच्यावतीने प्रदेशाध्यक्ष तथा भाजप नेते विजय चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व्हीआयपी गेस्ट हाऊस येथे आयोजित करण्यात आला होता यावेळी नगरसेविका योगिता नागले, राहुल गाडेकर, किरण सोनवणे, नंदकुमार राऊत ,सोमनाथ राऊत, प्रकाश काळे ,रोहित कर्पे, वनदेव सोनवणे, जगन्नाथ नागले , लहानू नागले ,रवींद्र कर्पे, चंद्रकांत वाव्हळ, अनिल जाधव, कैलास बनसोडे ,देविदास कहाने, अतुल साळुंके आदीसह महिला व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

यावेळी विजय चौधरी यांनी सांगितले की, तेली समाज हा अतिशय जागृत व्यापारी समाज आहे . राज्य पातळीवर सर्व जिल्ह्यांमध्ये सामुदायिक विवाह सोहळा ,रोजगार संदर्भातील मेळावे, डॉक्टर, इंजिनिअर, शासकीय अधिकारी कर्मचारी सेल, व्यापारी सेल यांच्या नियुक्ती तसेच युवक युवती कार्यकरणी मध्ये सर्व समाज बांधवांना समाविष्ट करण्यात येणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे मार्गदर्शन समाजास मिळत आहे. त्या माध्यमातून सर्व तालुक्यामध्ये समाज भवनास उभारणी करणार असून श्रीरामपूर शहरातील समाज भावनास एक लाख ११ हजार रुपये देणगी देण्यास जाहीर केली त्यांचे सर्व समाज बांधवांनी स्वागत केले. निलेश नागले यांनी प्रास्ताविकामध्ये शहर व तालुक्यातील समाजाचा आढावा मांडला.



**श्रीरामपूर** : येथील तिळवण तेली समाज मेळाव्यात तेली महासभेचे महाराष्ट्र अध्यक्ष विजय चौधरी मार्गदर्शन करताना दिसतात आहे यावेळी उपस्थित समाज बांधव.

समाजामध्ये असलेल्या अडीअडचणी ,श्रीरामपूर शहरांमध्ये असणारी जागेचा प्रश्न, विविध सेलचे नियुक्ती या संदर्भात चर्चा या संदर्भात हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. बेलापूरचे माजी सरपंच भरत साळुंके यांनी आभार भाषणात समाज बांधवांना सर्व पातळीवर ताकद देण्यात यावी अशी मागणी केली.

# वडाळा बहिरोबाच्या भैरवनाथ आखाड्यात कुस्त्यांचा थरार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा तालुक्यातील पश्चिम भागातील सर्वात मोठा व नियोजनबद्ध असलेला वडाळा बहिरोब येथील काल भैरवनाथाच्या यात्रा उत्सवातील कुस्त्याच्या आखाड्यात नामावंत मल्लांनी हजेरी लावत कुस्ती मल्लविद्येतील कसं दाखविले कुस्त्यांचा झालेल्या थरार पाहून कुस्तीशौकीनांच्या डोळ्याचे पारणे फिटले शेवटची कुस्ती विजेत्यास २१ हजारचे बक्षीस देण्यात आले. वडाळा बहिरोबा येथील यात्रा उत्सव मुळा साखर कारखान्याचे संचालक व देवस्थानचे अध्यक्ष भाऊसाहेब पाटील मोटे तसेच यात्रा कमिटीचे अध्यक्ष चांगदेव मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.



वडाळा बहिरोब (ता.नेवासा) येथील आखाड्यात कुस्ती लावतांना अध्यक्ष भाऊसाहेब मोटे, चांगदेव मोटे, अशोक जेम्स आदी.

येथील काल भैरवनाथाचे मंदिर अतिशय पुरातन असून या परीसरात जागृत देवस्थान असल्याबाबत भाविकांची श्रद्धा असल्यामुळे यात्रेनिमित्त परिसरातील हजारो भाविक दर्शनाला येत असतात यात्रेनिमित्ताने यात्रा कमिटीच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमासह मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यात कावड मिरवणूक, पालखी मिरवणूक, महाआरती, शोभेच्या दारूची अतिशबाजी त्याचबरोबर आर्केस्ट्रा कुस्त्याचा हगामा बैलगाडा शर्यत आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यात्रा उत्सव काळात गावापासून मंदिरासह मंदिरापर्यंत एक किलोमीटर अंतर केलेली विद्युत रोषणाई तसेच शोभेच्या दारूची अतिशबाजीचा सामना बघण्यासाठी परिसरातील गावातून हजारो भाविकांनी गर्दी केली होती. नेवासा तालुक्यात सर्वात शिस्त बद्ध व नियोजनबद्ध होणारा यात्रा उत्सव म्हणून अनेक दिवसाची वडाळा बहिरोबाची परंपरा आहे. हा यात्रा उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी देवस्थानचे अध्यक्ष भाऊसाहेब मोटे,उपाध्यक्ष बापूसाहेब मोटे,यात्रा कमिटीचे अध्यक्ष चांगदेव मोटे, ज्ञानेश्वर कारखान्याचे सचिव रवींद्र मोटे खजिनदार सतिश मोटे, माजी सरपंच दिलीप मोटे,पोलीस पाटील सुरेश नवगिरे, प्रकाश मोटे, माजी उपसरपंच राहुल मोटे, महेश मोटे, अतिश मोटे, प्रदीप मोटे, संभाजी मोटे, गणेश मोटे, निलेश मोटे, उमेश पतंगे, अशोक जेम्स, अनिल गायकवाड, जाखिर पठाण, बापूसाहेब मोटे पहिलवान, सुरेश मोटे, प्रभाकर मोटे,संजय मोटे यांनी परिश्रम घेतले.

द•ख•ल

## देडगाव ग्रामपंचायतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात



**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव ग्रामपंचायतमध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच चंद्रकांत मुंगसे, माजी चेअरमन कडूभाऊ तांबे, माजी सरपंच दत्ता पाटील मुंगसे, ज्येष्ठ पत्रकार एडके, चेअरमन जनाभाऊ देशमुख, उपसरपंच आनंद दळवी, माजी उपसरपंच बाळासाहेब मुंगसे, पोपट मुंगसे, शरद काशिनाथ तांबे, राजेंद्र ससाणे, श्रीकांत हिवाळे, विश्वास हिवाळे, आशिष हिवाळे, पत्रकार इंनुस पठाण, बाळासाहेब म्हस्के आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम प्रमुख मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रमुख मान्यवरांनी आपल्या मनोगतातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनकार्याचा परिचय करुन दिला. शेवटी फकीरचंद हिवाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## शिर्डीत आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन सभा उत्साहात

**शिर्डी** : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिर्डी येथील समाज मंदिरात अभिवादन सभा उत्साहात पार पडली. विविध सामाजिक संघटना, स्थानिक नागरिक व मान्यवरांच्या उपस्थितीत बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने झाली. यावेळी त्रिसरण व पंचशील ग्रहण करण्यात आले. वक्त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या शिक्षण, समता, बंधुता व सामाजिक न्यायासाठीच्या योगदानावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांची आजही समाजाला दिशा देणारी भूमिका अधोरेखित केली. अभिवादन सोहळ्यात स्थानिक पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, तरुणाई व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उपस्थितांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करत त्यांच्या विचारांचे आचरण करण्याची प्रतिज्ञा केली. तसेच संविधानातील मूल्यांचे पालन करण्याचा संकल्पही करण्यात आला. समाज मंदिर परिसर 'जयभीम'च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## संत तेरेजा चर्चवतीने डॉ. आंबेडकर जयंतीदिनी शुभेच्छा



**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथे परमपूज्य महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त संत तेरेजा चर्च हरेगाव येथील धर्मगुरू रे फा फ्रान्सिस ओहोळ यांच्या समवेत धर्मग्रामातील सर्व संघटनामधील पदाधिकारी ,यांनी भव्य मिरवणूक काढून हरेगाव स्मारक येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली सर्व आंबेडकरी बौद्ध समुदायास जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी डी एस गायकवाड,सुभाष पंडित विलास साळवे वाय जी त्रिभुवन,राजेंद्र मगर भाऊ साठे सुरेश बोधक अरुण बनसोडे अंतोन क्षीरसागर संजय कापसे ब्लासी दिवे बीजी पारधे,आल्हाट ,डॉ मोहन ,नीरज बनसोडे आदी उपस्थित होते.

## रामराव आदिक पब्लिक स्कूलमध्ये भारतरत्न डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

**श्रीरामपूर** : अशोकनगर येथील रामराव आदिक पब्लिक स्कूलमध्ये भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.कार्यक्रमाच्या प्रसंगी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा व विचारांचा आढावा घेण्यात आला. शिक्षण, समता आणि सामाजिक न्याय यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण झाली. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## भिमरत्न प्रतिष्ठाण साईनगर येथील डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन



**श्रीरामपूर** : येथे भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भिमरत्न प्रतिष्ठाण साईनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी भाजपा उत्तर महाराष्ट्र महामंत्री विजयजी चौधरी त्यांच्या समवेत जिल्हा उपाध्यक्ष दिपक पटारे, भाजपा नेते संजय फंड,तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे,शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड,गटनेते वैशाली ताई चव्हाण, नगरसेवक आशिष धनवटे, श्रीनिवास बिहाणी, संजय गांगड, शशांक रासकर, रवी पाटील, मारुती बिंगले, बाळासाहेब आहिरे, बंडूकुमार शिंदे, सरचिटणीस विशाल अंभोरे, उपाध्यक्ष विजय आखाडे, अल्पसंख्यांक अध्यक्ष असिफभाई पोपटीया, मनोज शिंदे, आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भिमरत्न प्रतिष्ठाणचे अध्यक्ष बाळासाहेब डफळ, उपाध्यक्ष दिनेश दळवी, सचिव रमेश निकाळजे, खजिनदार संतोष चव्हाण, कार्याध्यक्ष विकास गायकवाड, रमेश निकाळजे, सचिन दळवी, जालिंदर काळे,अरुण बोरुडे, रोहित जोंजाळ, भारत शिवदे , गुलाब गायकवाड, संतोष दळवी, दिपक फुलारे, संदीप दळवी, गोरख डफळ, विशाल थोरात, विजय राऊत आदींनी प्रयत्न केले.

## पान १ वरुन

### समताच्या ठेवी बाबत चाकणकरांचा खोटा जबाब : तृप्ती देसाई

समता पतसंस्थेच्या राहाता शाखेत प्रतिभा चाकणकर व त्यांचा मुलगा तन्मय यांचे नावे चार खाते असल्याने त्या काल शिर्डी पोलीस ठाण्यात आल्या. यावेळी त्यांचा जबाब नोंदविण्यात आला. जबाबाला येताना त्यांचा मुलगा तन्मय, वकील जयश्री काळे - पालवे व त्यांची एक मैत्रीण असे चार जण हजर होते. त्यांनी सांगीतले की, सदर खात्याचा आमचा काही संबंध नसून आम्ही त्या खात्यावर कोणताही आर्थिक व्यवहार केला नसून त्या खात्यावर असणाऱ्या सह्या देखील बनावट आहेत. त्यांनी समता पतसंस्थेत गेलोच नसल्याचा जबाब नोंदवला होता. यावरून पोलीसांनी त्यांना फसवणूकीचा गुन्हा दाखल करायचा का ? असे विचारले असता त्यांनी त्यात रस दाखवला नाही. या जबाबावर तृप्ती देसाई यांनी आरोप करत प्रतिभा या चक्क खोटे बोलत आहेत असा आरोप केला आहे. त्यासाठी पुराव्या दाखल त्यांचे व कॅप्टन खरातचे मोबाईल वर तब्बल २३६ कॉल रेकॉर्ड व १७ कॉल खरातने प्रतिभा यांना केल्याचे म्हंटले आहे. तसेच चाकणकर यांनी सकाळी ६ ते ९ या वेळेत २१८ मेसेज केले असल्याचे सांगत नुसते प्रतिभा ने नव्हे तर मुलगा तन्मय यानेही खरात यास ३७ कॉल व आलेले गेलेले मेसेज असल्याचे सांगितले.

### लोकसभेतील खासदारांची संख्या होणार ८५०

प्रदेश, मेघालय, मिझोरम आणि नागालँड यांसारख्या ईशान्य राज्यांमध्ये अनुसूचित जमातींचे प्रतिनिधित्व कायम राखण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्रिपुरामध्येही सध्याचे प्रमाण जतन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. नवीन तरतुदी लागू होईपर्यंत सध्याची लोकसभा आणि विधानसभांचा कार्यकाळ अबाधित राहणार आहे. डिलिमिटेशन पूर्ण झाल्यानंतरच नवीन रचना लागू होईल, त्यामुळे प्रशासनात सातत्य राहील.

### बिहारमध्ये नितीश कुमारांचा राजीनामा

यांच्या नावाची घोषणा केली आहे. नितीश कुमार यांनी बिहारचे मुख्यमंत्री म्हणून दीर्घकाळ कामकाज पाहिले आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपूर्वी त्यांनी राज्यसभेत जाण्याचा निर्णय घेतल्यानं त्यांचे समर्थक आणि पार्टीचे कार्यकर्त्यांची काहीशी निराशा झाला आहे. दिल्लीत जाण्यामागे नेमकं काय कारण आहे, हे समोर आले नसले तरी केंद्र सरकारसमवेत ते देशपातळीवर काम करणार आहेत. त्यासाठीच, नितीश कुमार यांनी १० एप्रिल २०२६ रोजी नवी दिल्लीत राज्यसभा सदस्य म्हणून खासदारकीची शपथ देखील घेतली. उपराष्ट्रपती आणि राज्यसभा अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांना शपथ दिली. नितीश कुमारांच्या या निर्णयामुळे बिहारच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

नितीश कुमार राष्ट्रीय राजकारणात सक्रीय होत आहेत. त्यामुळे, बिहारमध्ये भाजपला पहिल्यांदाच मुख्यमंत्रिपद मिळणार असून बिहारमधील अशा चर्चा सुरु आहेत. बिहारमध्ये नव्या सरकारच्या स्थापनेसंदर्भात तयारी जोरदार सुरु आहे. बिहारमधील सत्ताधारी जदयू आणि भाजपनं मंगळवारी त्यांच्या आमदारांची बैठक बोलावली आहे. या बैठकीतच बिहारच्या पुढील मुख्यमंत्र्यांचं नाव निश्चित होणार होते. बिहार भाजपचे अध्यक्ष संजय सरावगी यांनी भाजप आमदारांची बैठक बोलावली असून सायंकाळी एनडीएच्या आमदारांची बैठक विधानसभेच्या सेंट्रल हॉलमध्ये घेण्यात आली. या बैठकीला राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन आणि केंद्रीय पर्यवेक्षक म्हणून शिवराज सिंह उपस्थित होते. या बैठकीत सम्राट चौधरी यांची विधिमंडळ गटनेतेपदी निवड झाली असून तेच बिहारचे भाजपचे पहिले मुख्यमंत्री असणार आहेत.

### नेस्को 'म्युझिक कॉन्सर्ट'ने घेतला दोन विद्यार्थ्यांचा बळी

विद्यार्थ्यांसह सहा जणांना अटक करण्यात आली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात ड्रग्जचे उघडपणे सेवन होत असताना राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि स्थानिक पोलीस काय करत होते? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. मुंबईतील नामांकित महाविद्यालयांमधील विद्यार्थी या विळख्यात अडकत असताना, पालकांमध्येही भीतीचे वातावरण आहे. 'नशाखोरी' हा केवळ गुन्हेगारी विषय नसून तो युवा पिढीला नष्ट करणारा सामाजिक कॅन्सर बनला आहे, हेच या नेस्को सेंटरमधील घटनेने सिद्ध केले आहे.

याप्रकरणी पोलीस तपासात आयोजक कर्मचारी आणि पेडलरसह सहा जणांना अटक करण्यात आली आहे. खाजगी सुरक्षारक्षकांच्या भूमिकेची ही पोलीस असून चौकशी करीत आहे. सिंथेटिक ट्रकचा मोठा साठा उघड होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

१३ हजार रुपये भाड्याच्या खोलीतून ३० कोटींचा ड्रग्स व्यवसाय

केवळ १३ हजार रुपये भाड्याच्या छोट्या खोलीतून तब्बल ३० कोटी रुपयांचा ड्रग्स व्यवसाय चालवला जात असल्याचा धक्कादायक प्रकार मुंबईत उघडकीस आला आहे. अंधेरीतील सहार रोड परिसरात एमडी (सिंथेटिक ड्रग्स) तयार करणारी फॅक्टरी उभारून मोठ्या प्रमाणावर ड्रग्स उत्पादन आणि पुरवठा केला जात होता. या प्रकरणात पोलिसांनी कुख्यात ड्रग तस्कर मोहम्मद आरिफ मोहम्मद इलियास शेख (४४) याला अटक केली आहे. तो गुजरात पोलिसांच्या ताब्यातून फरार झालेला असून गेल्या काही काळापासून मुंबईत सक्रिय होता.

# कोकमठाण येथे डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**कोळपेवाडी प्रतिनिधी-**
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती कोकमठाण येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यामध्ये कोकमठाण ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि आंबेडकर नगर अशा विविध ठिकाणी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुधाकर रोहम आणि गौतम सहकारी बँकेचे व्हा. चेअरमन विजय रक्ताटे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले. यावेळी संचालक सुधाकर रोहम यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या भारतीय संविधानामुळे लोकशाही अधिक सक्षम झाली. त्यांच्या आदर्श विचारांवर वाटचाल करून समाजात समता व बंधुता निर्माण करणे आजची खरी गरज आहे. त्यामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करतांना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावे असे मत व्यक्त केले.

यावेळी सिद्धार्थ सेवा संघाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येवून जयंती निमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना



शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी सिद्धार्थ सेवा संघाचे पदाधिकारी, कोकमठाण ग्रामपंचायत पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## आर्टिकल रायटिंग स्पर्धेत प्रवरा फार्मसीचा तृतीय क्रमांक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा ग्रामीण औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एमएबीडी फार्मसी महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय स्तरावरील आर्टिकल रायटिंग स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे, अशी माहिती प्राचार्या डॉ. मंगथायारू के. यांनी दिली.

ॲकॅडमिक डिसीफरच्या सहकार्याने 'नॅनो टेक्नॉलॉजी बेस्ड ड्रग डिलिव्हरी सिस्टिम' या विषयावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. देशभरातून या स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला असून सुमारे ७० महाविद्यालयांमधील १५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती, लेखन कौशल्य आणि नवोपक्रमाची जाणीव वाढीस लागली असून हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरल्याचे मत सहभागी विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

प्रवरा महाविद्यालयाच्या विशाखा देशमुख, अंजली गवळी आणि पायल गिते यांनी उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक मिळविला. या विद्यार्थ्यांना प्रा. शुभम मनकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**पानेगांव:** येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मंगळवार दि १४ रोजी सकाळी ९ वा .डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौथऱ्यावर आकर्षक फुलसजावट, सडा रांगोळी, बरोबरच भिम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तोफांचा सलामीने धम्मचक्र ध्वज अनावरण करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारक येथे हि पुष्पहार अर्पण करुन वंदन करण्यात आले. ग्रामपंचायत पानेगांव कार्यालयात लोकनियुक्त सरपंच सौ. निकीता भोसले/ आंबेकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेचे पुजन करून अभिवादन केले.



भिम जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बी, आर वाघमारे, सुनिल भवार,विजय वाघमारे, राजेंद्र शेंडगे संजय पवार यांनी नियोजन केले.यावेळी सोनई करजगांव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे अध्यक्ष संजय जंगले, पानेगांव ग्रामपंचायत जेष्ठ सदस्य दत्तात्रय घोलप,पानेगांव संस्थेचे मार्गदर्शक जालिंदर जंगले,पानेगांव ग्रामपंचायत माजी उपसरपंच जयवंत गुडधे, हरिभाऊ जंगले, डॉ. काकडे, गजानन चिंधे ,बारकू जंगले, पांडुरंग जंगले, सुनिल भवार, बी वाय वाघ, बी आर वाघमारे, संजय पवार, राजेंद्र शेंडगे, बापूराव जंगले, दिलीप वाघमारे, सुभाष गागरे, अंकुश जिवरक, सुदाम जंगले, शिवाजी जंगले, नामदेव चिंधे बबनराव जंगले, बाळासाहेब वाघमारे, संजय वाघमारे, विजय वाघमारे, विजय जंगले, बाळासाहेब वतनदार आदीं सह ग्रामस्थ मान्यवर उपस्थित होते.

## संविधानामुळे सर्वसामान्यांना मान-सन्मान मिळाला : आ. खताळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**संगमनेर :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे सर्वसामान्य नागरिकांना मान-सन्मान मिळाला असून, त्याच संविधानाच्या बळावर माझ्यासारख्या सामान्य कुटुंबातील कार्यकर्त्याला या तालुक्याचे लोकप्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे, असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आमदार खताळ यांच्या हस्ते पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की, पूर्वी समाजामध्ये अस्पृश्यता, शिक्षणाबाबत उदासीनता आणि अंधश्रद्धा यांचा मोठा प्रभाव होता. मात्र, डॉ. आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा आणि लढा हा मूलमंत्र देऊन समाजातील विषमता दूर करण्याचे काम केले. त्यांच्या कार्यामुळे सर्व समाजघटकांना न्याय मिळाला आहे.काही जण शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांचा वापर केवळ भाषणांपुरता व निवडणुकांपुरता करतात; मात्र आम्ही त्या विचारांना प्रत्यक्ष कृतीत उतरवत आहोत, असे सांगत आमदार खताळ यांनी विरोधकांवर टीका केली.

या कार्यक्रमाला आरपीआयचे ज्येष्ठ नेते संतोष रोहम, आर पी आय (आठवले गट) तालुका अध्यक्ष आशिष शेळके, शहराध्यक्ष कैलास कासार, शिवसेनेचे तालुकाप्रमुख रामभाऊ राहाणे, शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, रमेश काळे, मंजाबापू साळवे राजेंद्र बलसाने देविदास कदम, किशोर वाघमारे शशांक नामन, लाला दायमा, अक्षय वर्पे, सौरभ देशमुख, सुशील शेवाळे, विकास जाधव, संगीता पुंड, रेखा गलांडे, सपना जाधव, अर्पिता पगारे, श्याम कोळपकर यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## टाकळीभान येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**टाकळीभान:** येथे विविध ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी स्टँड परिसर या ठिकाणी टाकळीभान दूरक्षेत्रचे पो.हे. बैसाने यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांबरोबरच छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले यांच्या पुतळ्याचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून तीनही महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. तसेच ग्रामपंचायत या ठिकाणी गावातील मान्यवर व पदाधिकारी यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले आदी महापुरुषांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. जयंतीनिमित्त गावामध्ये तीनही महापुरुषांना अभिवादन करण्यात येत असून समतेचा चांगला पायंडा गावामध्ये पडला आहे. स्टँड परिसर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त कु. पंकजा संदीप शिनगारे हिने डॉ. बाबासाहेबांच्या कार्य कर्तुत्वाबद्दल सुंदर विचार मांडले. त्याचप्रमाणे टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूल, सर्व जिल्हा परिषद शाळा, ग्रामीण माध्यमिक विद्यालय, गावातील पब्लिक स्कूल आदी सह विविध ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली.

या प्रसंगी माजी सभापती नानासाहेब पवार, अशोकचे माजी अध्यक्ष ज्ञानदेव साळुंके, अशोकचे कारेगाव भागचे संचालक शिवाजीराव शिंदे, अशोकचे संचालक यशवंत रणनवरे, सेवा संस्थेचे माजी चेअरमन राहुल पटारे, उपसरपंच कान्हा खंडागळे, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे,शेतकरी संघटनेचे प्रवक्ते प्रा.कार्लस साठे सर, तंटामुक्तीचे अध्यक्ष आबासाहेब रणनवरे, सोसायटीचे व्हा.चेअरमन अविनाश लोखंडे, नारायण काळे,ॲड रत्नकर रणनवरे, दत्तात्रय नाईक,प्रा. दिलीप कोकणे, मुकुंद हापसे, अनिल बोडखे, बापूसाहेब शिंदे, संजय रणनवरे,सुंदर रणनवरे, मोहन रणनवरे, मल्हार रणनवरे, सतीश रणनवरे, जॉन रणनवरे,शिवा साठे,भाऊसाहेब गव्हाणे, अशोक रणनवरे, अण्णासाहेब दाभाडे,राजेंद्र रणनवरे , बाळासाहेब शेळके,आनंद कांबळे,संतोष कांबळे, विजय आहेर,राजेंद्र साळवे, संदीप शिंगारे, ग्रामसेवक भिंगारदे व ग्रामपंचायत कर्मचारी आदीसह गावातील मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.





## द्रोणा शैक्षणीक संस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**शिर्डी :** राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी. यावेळी द्रोणा अकॅडमी चे अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम, शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते.

द्रोणा अकॅडमीचे अध्यक्ष जयराज दडवते यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

वर्षा कोते , आरती सोमासे, रेश्मा डोखे यांनी यावेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त माहिती सांगितली व त्यांचा जीवन परिचय करून दिला. व राज्यघटने बद्दल माहिती सांगितली. प्री प्रायमरी विभागातील शिक्षिकांनी सुंदर गीत सादर केले. या गीतास सर्वांनी टाळ्या वाजवून दात दिली.

सूत्रसंचालन मरलीन जॉन यांनी केले

## निधन वार्ता

### आण्णासाहेब आसने



**माळवाडगांव :** येथील प्रगतशील शेतकरी आण्णासाहेब बाबुरांव आसने ( वय ७२) यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन मुली,सुना नातवंडे,पाच भाऊ, भावजया,पुतणे असा मोठा परिवार आहे.

# एका महिन्यात राहता शहरातील महामार्ग पूर्ण होणार : डॉ. सुजय विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
राहाता : नगर-मनमाड महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात आले असून राहता शहरातील रस्त्याचे काम येत्या एका महिन्यात पूर्ण करण्यात येईल. पावसाळ्यापूर्वी हा रस्ता नागरिकांच्या सेवेसाठी खुला करण्याचा विश्वास भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.

डॉ. विखे पाटील यांनी आज सकाळी राहता शहरातील नगर-मनमाड महामार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत गटर्स, डिव्हायडर तसेच रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाची पाहणी करण्यात आली. ग्रामीण रुग्णालय ते शहर हद्द तसेच साकुरी फाटा ते मार्केट कमिटी परिसरातील कामांचा आढावा घेण्यात आला. नगराध्यक्ष स्वाधीन गाडेकर, नगरसेवक, पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

रस्त्याच्या साईड लेव्हल्समुळे व्यापाऱ्यांना अडचणी निर्माण होऊ नयेत, यासाठी रस्त्याच्या डिझाइनमध्ये बदल करण्यात आले आहेत. रस्त्याची उंची नियंत्रित ठेवून दुकानदारांचे नुकसान टाळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बसस्थानक परिसरात समतोल पातळी राखत नव्या डिझाइननुसार रस्ता विकसित केला जात आहे.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना नवीन फुटपाथ तयार करून पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध केला जाणार आहे. तसेच जुने डिव्हायडर काढून एकसंध डिव्हायडर उभारला जाणार असून, लाईट पोल व झाडांचे योग्य नियोजन करून स्थलांतर केले जाणार आहे. शहरात इलेक्ट्रिकल तर शहराबाहेरील भागात सोलर स्ट्रीट लाईट बसवण्याचे नियोजन आहे.

या महामार्गामुळे नागरिकांना सुरक्षित व सुलभ प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. अपघातांची दखल घेऊन कामाला गती देण्यात आली असून कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही डॉ. विखे पाटील यांनी दिला.




## नशिबाची परिक्षा

बुधवार दि .१५ एप्रिल २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

१८० २७० ९०० ९-१ १४६ १२८ ११९

जोड ३१-२४-५७ १८-९०

**कल्याण**

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

१९० १४५ ११८ ०-६ १२३ १५० ११४

जोड ०३-२६-४५ १९-६७

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

२६० ३५० ११६ ८-९ १२६ १८० ११७

जोड ८१-५९-७४ २०-९६

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द•ख•ल



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्राचे महिलांना पुस्तके वाटप

**अहिल्यानगर** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनचरित्रावरील पुस्तके महिलांना वाटप करण्यात आली. या उपक्रमाद्वारे बाबासाहेबांच्या विचारांचा घरोघरी प्रसार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा उपक्रम राज्य शासनाचा पुरस्कार प्राप्त तथा भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे सरचिटणीस सुनिल सकट यांच्या पुढाकाराने घेण्यात आला. बाबासाहेबांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करत समाजात समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जपणूक करण्याचे यावेळी आवाहन करण्यात आले.

समाजातील वंचित घटकांना उभारी देणारे बाबासाहेबांचे विचार आजही तितकेच महत्त्वाचे असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मार्केटयार्ड परिसरातील बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महिलांना पुस्तके वाटप करण्यात आली. या वेळी अशोक शिंदे, भाजपा शहर जिल्हा सचिव डॉ. संदिप पवार, राष्ट्रवादीचे शहर उपाध्यक्ष आनंद राठोड, मानवी हक्क अभियानचे जिल्हा संघटक अशोक भोसले, भाजपा शहर कार्यकारिणी सदस्य दीपक उमाप आदी मान्यवर उपस्थित होते.

## प्रभात फेरी, व्याख्याने व सामाजिक उपक्रमांनी डॉ.आंबेडकर यांची जयंती साजरी

**लिंपणगाव** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १४ एप्रिल रोजी श्रीगोंदा तालुक्यात मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. तालुक्यातील विविध गावांमध्ये शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, ग्राम पंचायती तसेच सामाजिक संघटनांच्या वतीने दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

पहाटेपासूनच तालुक्यातील अनेक गावांमध्ये प्रभात फेरी काढण्यात आली. जय भीमच्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते. युवक, विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने या फेरीत सहभाग घेतला. अनेक ठिकाणी चौकाचौकात बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तालुक्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध, वक्तृत्व व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित सादरीकरणे करून कार्यक्रम रंगतदार केले. काही ठिकाणी ग्रंथ प्रदर्शन भरवून त्यांच्या विचारांचा प्रसार करण्यात आला. या निमित्ताने अनेक सामाजिक उपक्रमही राबवण्यात आले. गरजू नागरिकांना अन्नदान, वस्त्रदान, तसेच आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. काही गावांमध्ये स्वच्छता मोहिम राबवून समाजसेवेचा आदर्श निर्माण करण्यात आला. महिला बचत गट, युवक मंडळे आणि विविध सामाजिक संघटनांचा सहभाग उल्लेखनीय होता. सर्व समाजघटकांनी एकत्र येत बाबासाहेबांच्या विचारांचा जागर केला. या सर्व कार्यक्रमांमुळे श्रीगोंदा तालुक्यात प्रेरणादायी, एकात्मता आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले.

## डॉ. आंबेडकरांचे विचार समाजासाठी प्रेरणादायी : चेअरमन बाबासाहेब मुदगल

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी चेअरमन बाबासाहेब मुदगल म्हणाले की, समाज शिकला पाहिजे, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते. यावेळी पतसंस्थेच्या वतीने पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना चेअरमन बाबासाहेब मुदगल, व्हाईस चेअरमन कैलास चावरे, ज्येष्ठ संचालक जितेंद्र सारसर, ज्येष्ठ संचालक सतीश ताठे, शेखर देशपांडे, विकास गीते, किशोर कानडे, बाळासाहेब गंगेकर, बाळासाहेब पवार, विजय कोतकर, सोमनाथ सोनवणे, बलराज गायकवाड, अजय कांबळे, गुलाब गाडे, संचालिका प्रमिला पवार, कार्यलक्ष्मी संचालक आनंद तिवारी आदी उपस्थित होते.

## भीमशक्तीच्या वतीने डॉ.आंबेडकर यांच्या १३५ वी जयंती साजरी

**अहिल्यानगर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भीमशक्तीच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्ण कृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी भीमशक्तीचे शहर जिल्हाध्यक्ष संजय जगताप समवेत शहर उपाध्यक्ष अभय गायकवाड, शहर सचिव विशाल भिंगारदिवे, संघटक सुनील भिंगारदिवे, संपर्कप्रमुख विनायक साठे, जिल्हा सचिव पोपट जाधव, संघटक अमोल काळपुंड, अशोक खंडागळे, विवेक चंदनशिव आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी संजय जगताप म्हणाले की, बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करून बाबासाहेबांनी संघर्षमय जीवनातून विषमता नष्ट होऊन मानवाला मानव म्हणून जगण्याचा अधिकार दिला. देशात स्वतंत्र्य, समता, बंधुता, न्याय, एकात्मता निर्माण करण्यासाठी सर्वसमावेशक घटना लिहिली तसेच बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे ही आपली जबाबदारी असून त्यांचे विचार समाजाला दिशा देणारे आल्याची भावना व्यक्त केली.



# १३५ किलो केकसह भारतरत्न बाबासाहेबांची जयंती उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरात अभूतपूर्व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर देवा पातारे, अँड. संजय कांबळे, राहुल पगारे, रवींद्र पहिलवान, वसीम शेख आणि राजू दनाने यांच्या पुढाकारातून १३५ किलोचा भव्य केक आणून जयंती मोठ्या थाटात साजरी करण्यात आली.

ढोल-ताशांच्या गजरात १३५ किलोचा केक मिरवणुकीने आणण्यात आला. यावेळी परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थितांनी जय भीमच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर केक कापून उपस्थित उपासक,उपासिकाना वाटप करण्यात आले.

१३५ किलोचा केक सर्व नागरिकांमध्ये वाटण्यात आल्याने कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले.

या उपक्रमामुळे सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिक, आंबेडकरी अनुयायी आणि युवक उपस्थित होते.

# श्रीगोंद्यात आंबेडकर जयंती उत्साहात

## विद्यार्थ्यांत स्पर्धा परीक्षेची जागरूकता रुजविण्याचा अभिनव उपक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**श्रीगोंदा** : भारताचे संविधान शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त श्रीगोंदा येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह तसेच सावित्रीबाई फुले यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे शासकीय वसतिगृहात विविध उपक्रमांनी भरलेला प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या प्रसंगी विद्यार्थ्यांसाठी चवदार तळे सत्याग्रह : मानवी हक्कांची पायाभरणी या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. तसेच डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित वकृत्व स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांनी विचारांची धार आणि अभिव्यक्तीची ताकद दाखवून दिली.

कार्यक्रमाचा मुख्य फोकस होता तो म्हणजे फक्त जयंती साजरी नाही, तर विचार रुजविणे असा स्पष्ट दिसून आला.विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांबाबत जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी दर्जेदार स्पर्धा परीक्षा साहित्यही वितरित करण्यात आले. ज्ञान हेच शस्त्र हा बाबासाहेबांचा मंत्र अक्षरशः कृतीत उतरवण्याचा प्रयत्न येथे दिसून आला.

यावेळी वसतिगृह अधीक्षक प्रथमेश तावरे, संगीता आढाव, प्रवीण साळवे, राजेश भराटे तसेच साई पब्लिकेशन, पुणे यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विद्यार्थी व कर्मचारी वर्गाचा उत्स्फुर्त सहभाग कार्यक्रमाला वेगळेच बळ देणारा ठरला.

आंबेडकर जयंतीचा कार्यक्रम झाला, पण तो फक्त औपचारिक नव्हता तर तो होता विचारांचा, स्पर्धेचा आणि स्वप्नांना पंख देणारा असेही मुलांच्या तोंडून ऐकण्यास मिळाले

# डॉ.आंबेडकर जयंतीला मिळाली नवदृष्टी



**अहिल्यानगर** : फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या पुढाकाराने नुकतेच घेण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी शिबिर व मोतीबिंदू शिबिराच्या माध्यमातून ५७ ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळाली. पुणे येथे मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण होवून ज्येष्ठ नागरिक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरात परतले.

शहरात परतलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी बाबासाहेबांना अभिवादन करुन त्यांचा जय घोष केला. फिनिक्स फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी ज्येष्ठ नागरिकांचे स्वागत केले. आगळ्या-वेगळ्या पध्दतीने दृष्टीदोष असलेल्या गरजू घटकांवर मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेने त्यांना नवदृष्टी देऊन बाबासाहेबांची जयंती उपेक्षितांना आधार देऊन साजरी करण्यात आली. शस्त्रक्रिया झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.

आर्थिक दुर्बल घटकातील दृष्टीहीन रुग्णांना दृष्टी मिळण्यासाठी जिल्ह्यात फिनिक्स फाऊंडेशनने मोठी चळवळ उभी केली आहे. दरवर्षी महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथीनिमित्त फिनिक्सच्या माध्यमातून शिबिर घेऊन गरजूंवर पुणे येथील के.के. आय बुधराणी मध्ये मोफत मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया केल्या जात आहे. आर्थिक दुर्बल घटकातील दृष्टीहीन रुग्णांना दृष्टी मिळण्यासाठी हे शिबिर आधार ठरत आहे. बाबासाहेबांनी संपूर्ण आयुष्य दीन-दुबळ्यांसाठी वेचले त्यांच्या कार्याचा आणि विचाराचा वारसा घेऊन फिनिक्स फाऊंडेशन कार्य करत असल्याचे जालिंदर बोरुडे यांनी सांगितले. दर महिन्याला गरजू रुग्णांसाठी मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन केले जाते. या शिबीराच्या माध्यमातून नेत्रदान व अवयवदानाची देखील जनजागृती सुरु असल्याची माहिती त्यांनी दिली.

# पारनेर तालुक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**पारनेर** : अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती (१४ एप्रिल २०२६) मोठ्या उत्साहात आणि भव्य प्रमाणात साजरी करण्यात आली. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व स्तरातील नागरिकांनी या उत्सवात उत्साहाने सहभाग घेतला. बाबासाहेबांच्या आदर्शांवर आधारित समता, न्याय, शिक्षण आणि सामाजिक बंधुत्वाच्या मूल्यांचा जागर करण्यात आला.

नगर पारनेर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. त्यानंतर आमदार दाते यांनी बाबासाहेबांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी समस्त देशवासीयांना आंबेडकर जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाच्या माध्यमातून देशाला समता आणि न्यायाचा मार्ग दाखवला असल्याचे त्यांनी सांगितले.

भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथजी कोरडे यांनी देखील बाबासाहेबांच्या पुतळ्याचे पूजन करून अभिवादन केले. त्यांनी बाबासाहेबांच्या शिकवणीप्रमाणे शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीचा अवलंब करून समाजातील विषमता दूर करण्याचे आवाहन केले. पारनेरचे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांनीही पुतळ्यास पुष्पवृष्टी करून महामानवाला अभिवादन केले आणि समस्त देशवासीयांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

आज दिवसभर पारनेर शहर आणि संपूर्ण तालुक्यात आंबेडकर जयंतीचा उत्सव पाहायला मिळाला. शहरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. रात्री आकर्षक रोशणाई करण्यात आल्याने पूर्ण शहर दिव्यांनी उजळून निघाले होते. बाबासाहेबांच्या प्रतिमा आणि पुतळ्याभोवती फुलांची सजावट, ध्वज आणि बॅनर्सने वातावरण भक्तिमय झाले होते.

यावेळी प्रमुख उपस्थिती होती: भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे, माजी नगरसेवक शंकर नगरे, नगरसेवक अशोक चेडे, नगरसेवकअमित जाधव, निखिल गायकवाड, राजेंद्र उबाळे, टाकळी ढोकेश्वरचे माजी सरपंच शिवाजी खिलारी, ड .तुषार औटी, लहू भालेकर, सुभाष दुधाडे, श्रीमती सोबले, ॲड सोनवणे, किरण सोनवणे, सचिन नगरे, राजे सर, माजी सरपंच श्रीमती मोरे,

सचिन उमाप, अनिल सातपुते, संजीवन सोनवणे, रोहन नगरे, निलेश गायकवाड, अक्षय जाधव, अजय जगताप, प्रकाश नगरे, ऋतिक गायकवाड, योगेश कांबळे, राकेश अल्हाट, करण धोत्रे आदी. यांच्यासह बौद्ध बांधव, ग्रामस्थ आणि पारनेर तालुक्यातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते नव्हते तर संपूर्ण भारतातील सामाजिक न्यायाचे प्रतीक आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त पारनेरकरांनी एकत्र येऊन त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प केला. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा ही बाबासाहेबांची शिकवण आजही प्रासंगिक आहे.

# कौठा जिल्हा परिषद शाळेत डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त पुस्तके भेट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव** : दिनांक १४ एप्रिल रोजी जिल्हा परिषद केंद्र शाळा कौठा येथे आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहत साजरी करण्यात आली.

यावेळी शाळेतील मुलांनी डॉ आंबेडकर यांच्याविषयी मनोगत व्यक्त केले. तसेच शाळेतील शिक्षक श्री जाधव सर, श्री नितीन भोईटे सरांनी मुलांना महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी जीवनातील महत्वाचे प्रसंग सांगितले.

कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक कार्यकर्ते श्री शिवाजी परकाळे अध्यक्ष श्री छत्रपती शिवाजी वाचनालय, सचिव राजेंद्र परकाळे यांनी शाळेतील वाचनालयासाठी १०० पुस्तके भेट देऊन एक आदर्श निर्माण केला कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी कौठा गावचे सरपंच श्री बापू(आण्णा )मोरे होते.

यावेळी मुख्याध्यापक ठुबे सर, सुभाष परकाळे,उत्तमराव शिपलकर,रमेश परकाळे, विजू भालेराव, राजेंद्र भालेराव, दत्ता शेलार, नितीन मोरे, ऍड. लोंढे व मोठया संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नितीन भोईटे सर यांनी केले तर आभार श्री तांबोळी सर यांनी मानले.

## महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर

# भारतीय समाज परिवर्तनाचे आधारस्तंभ : इंगावले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अमरापुर** : मारुतरावजी घुले पा शिक्षण संस्थेचे दहेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ जूने ता शेवगाव आज विद्यालयात शिक्षणाचे पुरस्कर्ते महात्मा जोतिबा फुले यांची १९९ वी आणि भारतरत्न ,भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष नंदु पा भोसले ( शा. व्य. समिती अध्यक्ष) हे होते याप्रसंगी मुख्याध्यापक इंगावले सर व नंदु पा भोसले यांच्या हस्ते महात्मा फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले प्रास्ताविकात इंगावले सरांनी सांगितले की, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय समाज परिवर्तनाचे आधारस्तंभ आहेत महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षण स्त्री-पुरुष समानता, शेतकरी आणि बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी मोठा लढा दिला सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी जातीय अन्याय, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता या विरोधात आवाज उठवला स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे उघडे केली आणि वंचित घटकांना स्वाभिमानाची जाणिव करून क्रांतिकारी कार्य केले महात्मा फुले यांनी पेटवलेली सामाजिक परिवर्तनाची ज्योत भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाने अधिक प्रखर केली. या वेळी कु. शर्वरी मगर, श्वेता रणदिवे या विद्यार्थ्यांनीनी

अध्यक्षीय भाषणात नंदु पा. भोसले यांनी महात्मा फुले डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी माहिती सांगून अभिवादन केले या प्रसंगी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक बाळासाहेब तुपविहिरे, प्रमिला बोडखे मॅडम, भाऊसाहेब बर्डे, विशाल जोशी, यशोदास वाघमारे, विकास व्यवहारे, राजाराम लिंभोरे, देविदास आरगळे, गोरख लिंभोरे आणि विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघमारे सरांनी केले आणि आभार जोशी सरांनी व्यक्त केले.

# हनुमंत रायकर यांनी शिक्षण संस्थेत उत्तम प्रकारे ज्ञानदान केले : नागवडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव** : हनुमंत रायकर यांनी उत्तम प्रकारे ज्ञानदान करून गुणवंत विद्यार्थी घडविले असे गौरवोद्गार नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी काढले.

वांगदरी येथील शिवाजीराव नारायणराव नागवडे विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक हनुमंत रायकर हे प्रदीर्घ सेवेतून निवृत्त होत आहेत त्या प्रित्यर्थ हंगेवाडी येथे शिक्षण संस्था, विद्यालय व ग्रामस्थांसाठी स्नेहभोजन कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधा नागवडे ह्या होत्या.

व्यासपीठावर नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, उपाध्यक्ष संदीप औटी, ज्येष्ठ संचालक सुभाषराव शिंदे, लक्ष्मण रायकर, जीवन शिपलकर, भाऊसाहेब नेटके, आप्पासाहेब धायगुडे, तुळशीराम रायकर, संस्थेचे निरीक्षक बी. के. लगड, निरीक्षक सचिनराव लगड, रामभाऊ रायकर, भाऊसाहेब कोळपे, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक आप्पासाहेब जगताप, रामदास झेंडे, रमजान हवलदार, नवनाथ घोडके, मधुकर कन्हेरकर, नगरसेविका चांदणी खेतमाळीस, अशोक आळेकर आदींसह शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना नागवडे म्हणाले, हनुमंत रायकर यांनी शिक्षण संस्थेत एकतीस वर्षे प्रामाणिकपणे सेवा केली. उत्तम प्रकारे ज्ञानदान करताना गुणवंत विद्यार्थी घडविले. सहकार महर्षी बापूंनी ग्रामीण भागात खेडोपाडी शिक्षणाची गंगा सुरू केली. त्यातून अनेक विद्यार्थी उच्चपदस्थ झाले. या शिक्षण संस्थेत शिक्षकांनी देखील प्रामाणिकपणे ज्ञानदान करताना संस्थेचा नवलौकिक वाढत अनेक ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तळमळीने उत्तम प्रकारे शिक्षण देत आज अनेक विद्यार्थी न्यायाधीश, डॉक्टर, इंजिनिअर, उद्योगपती या क्षेत्रात उंच प्रकारे भरारी घेत असल्याचे सांगून श्री नागवडे यांनी याचे सर्व श्रेय बापूंना जाते. असे सांगून श्री नागवडे यांनी रायकर यांना पुढील दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

नागवडे कारखान्याचे संचालक सुभाषराव शिंदे यावेळी बोलताना म्हणाले की, सहकार महर्षी बापूंच्या दूरदृष्टीमुळे त्यांनी श्रीगोंदा सारख्या दुष्काळी तालुक्याला वैभव मिळून दिले. सहकार, शिक्षण व सिंचनासाठी बापूंनी अहोरात्र कष्ट घेऊन तालुक्याचा कायापालट केला. बापूंच्या नंतर आजही नागवडे कुटुंब प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी होत आहेत. हनुमंत रायकर यांनी नागवडे कुटुंबाशी एकनिष्ठ राहत उत्तम प्रकारे ज्ञानदान केले. यापुढेही त्यांनी नागवडे कुटुंबियांच्या पाठीशी उभे राहून सामाजिक व शैक्षणिक कार्यास आपले योगदान द्यावे असे शिंदे यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात अनुराधा नागवडे बोलताना म्हणाले की, हनुमंत रायकर हे सुसंस्कृत व हाडाचे शिक्षक म्हणून त्यांची ओळख आहे. ३१ वर्षे ज्ञानदीप परिवारात शिक्षक म्हणून काम करताना सेवानिवृत्तीनंतर निश्चितपणे त्यांची उनीव भासणार असणार आहे. सहकार महर्षी बापूंनी तालुक्याच्या विकासात योगदान देत असताना उत्तम प्रकारे शिक्षणाचा पाया भक्कम करून सर्व क्षेत्राला न्याय दिला. बापूंनी दिलेल्या योगदानामुळेच श्रीगोंदा तालुका आज सर्वच क्षेत्रात सुजलाम सुफलाम झाल्याचे सौ नागवडे यांनी सांगून श्री रायकर यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

यावेळी संस्थेचे निरीक्षक बी के लगड, शिक्षक नेते रमजान हवालदार, रामभाऊ रायकर, भाऊसाहेब कोळपे, आप्पा धायगुडे, नगरसेवक चांदणी खेतमाळीस आदींनी हनुमंत रायकर यांच्या कार्यकर्तृत्वावर स्तुतीसुमने वाहिली. सूत्रसंचालन मुख्याध्यापक दिलीप काटे यांनी केले. आभार नगरसेविका चांदणी खेतमाळीस यांनी मानले.

# वयोवृद्धांची फसवणूक करणारी टोळी जेरबंद; सहा आरोपी अटकेत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मंचर (ता. आंबेगाव) :** वयोवृद्ध महिला व पुरुषांना लक्ष्य करून फसवणूक करणाऱ्या परजिल्ह्यातील सराईत गुन्हेगारांच्या टोळीचा मंचर पोलिसांनी पर्दाफाश करत सहा जणांना अटक केली आहे. बनावट पिवळ्या धातूची बिस्किटे 'सोन्याची' असल्याचा भास निर्माण करून, त्याबदल्यात खरे सोन्याचे दागिने हिसकावून घेण्याची या टोळीची पद्धत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

मंचर पोलीस स्टेशन हद्दीत अशा प्रकारच्या फसवणुकीचे काही गुन्हे घडल्याने पोलिसांनी तपासाची सूत्रे वेगाने हलवली. पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांनी या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून विशेष पथके तयार करून आरोपींचा शोध सुरू केला.

दरम्यान, ९ एप्रिल २०२६ रोजी मौने कळंब (ता. आंबेगाव) येथील पुणे-नाशिक महामार्गालगत जीवन हॉटेलजवळ संशयास्पदरीत्या उभी असलेली पांढऱ्या रंगाची कार पोलिसांच्या निदर्शनास आली. पोलिसांनी तत्काळ कारची तपासणी केली असता त्यामध्ये सहा संशयित आढळले. सुरुवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, मात्र कसून चौकशीनंतर त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.



अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये गणेश विनायक गायकवाड, बंडू लक्ष्मण जाधव, मनोहर भाऊसाहेब जाधव, खंडू बंडू जाधव, सतीश रस्तूम पवार आणि सोमनाथ निवृत्ती फुंदे यांचा समावेश आहे. हे सर्व आरोपी परजिल्ह्यातील असून त्यांनी मंचर परिसरात यापूर्वीही अशाच प्रकारचे दोन गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ अंतर्गत कलम ३१८ (४), ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान आरोपींकडून फसवणुकीत मिळवलेले सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

या कारवाईत गुन्ह्यात वापरण्यात आलेली सुमारे १ लाख रुपये किंमतीची कार (चक-१२-घछ-३८९८) तसेच २ लाख ९३ हजार १९० रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख ९३ हजार १९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदिप गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे आणि पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व मंचर पोलीस स्टेशनच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

## द•ख•ल

## ज्येष्ठ पत्रकार प्रकाश भोईटे यांचे निधन



**सासवड :** पुणे जिल्ह्यातील ज्येष्ठ व निर्भीड पत्रकार प्रकाश भोईटे यांचे प्रदीर्घ आजारानंतर निधन झाले. त्यांच्या निधनामुळे पत्रकारिता क्षेत्रात शोककळा पसरली असून विविध स्तरांतून हळहळ व्यक्त केली जात आहे.प्रकाश भोईटे हे मागील काही काळापासून आजाराशी झुंज देत होते. वैद्यकीय उपचार सुरू असतानाही त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही आणि अखेर त्यांनी आज अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांसह सहकारी, मित्रपरिवार आणि पत्रकारितेतील सहकाऱ्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. भोईटे यांनी आपल्या दीर्घ पत्रकारितेच्या कारकिर्दीत सामाजिक, राजकीय आणि स्थानिक प्रश्नांवर प्रभावीपणे भाष्य केले. त्यांच्या लेखनात सत्यता, वस्तुनिष्ठता आणि समाजाभिमुख दृष्टीकोन दिसून येत होता. तडफदार व प्रामाणिक पत्रकार म्हणून त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या लेखनामुळे समाजात जनजागृती घडून आली. पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी त्यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. प्रकाश भोईटे यांच्याशी माझे २००७ पासून जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांनी एक चांगला मित्र आणि जबाबदार पत्रकार म्हणून नाते जपले. त्यांच्या जाण्याने मी जिवलग मित्र गमावला आहे. ही घटना मनाला चटका लावणारी आहे, अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली. भोईटे यांनी आपल्या कार्यकाळात अनेक तरुण पत्रकारांना मार्गदर्शन केले. साधी, स्पष्ट आणि प्रभावी लेखनशैली ही त्यांची ओळख होती. समाजातील विविध घटकांशी त्यांनी सतत संपर्क ठेवत त्यांच्या समस्या पुढे आणल्या. त्यांच्या निधनामुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करत सर्व स्तरातून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

## पोंदेवाडीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**लोणी धामणी :** पोंदेवाडी (ता. आंबेगाव) येथे ग्रामपंचायत कार्यालय व समस्त ग्रामस्थांच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले. महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला मूलमंत्र आजही समाजाला दिशा देणारा ठरत आहे. भारताची सार्वभौम राज्यघटना बाबासाहेबांनी अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने तयार केली. या संविधानाच्या बळावरच देशातील सर्वसामान्य नागरिकाला न्याय मिळतो आणि देशाचा कारभार लोकशाही मार्गाने सुरळीतपणे चालतो. तालुक्यासह जिल्ह्यात उत्साही वातावरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी होत आहे. यावेळी आंबेगाव तालुका खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष अनिल वाळुंज, माजी उपसरपंच संदीप पोखरकर, महेंद्र पोखरकर, निलेश मांजरे, अमोल वाळुंज, आनंदा पोंदे, चंदकांत विरकर व पोंदेवाडी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## आळंदीत आंबेडकर जयंती उत्साहात तक्षशिला बुद्ध विहारात अभिवादन

**आळंदी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त तक्षशिला बुद्ध विहार येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करून अभिवादन करण्यात आले. सामूहिक त्रिशरण व पंचशील बुद्ध वंदनेने कार्यक्रमास सुरुवात झाली. खेड-आळंदीचे आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते डॉ.आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी नगरसेवक सागर कुऱ्हाडे, गोविंद कुऱ्हाडे, दिनेश घुले, सुरेश झोंबाडे, आनंदराव मुंगसे, सुनिता रंधवे यांच्यासह ज्ञानेश्वर रंधवे, विश्वनाथ थोरात, प्रवीण रंधवे, आनंद रणदिवे, सुभाष भोसले, विनायक गायकवाड, नामदेव सुरपल्लीकर, बाळासाहेब दादू भोसले, भिमराव थोरात, नितीन थोरात, अशोक थोरात, बाळासाहेब पोपट भोसले, संजय रंधवे, प्रशांत रंधवे, प्रभानंद शेलार, अजित थोरात, अभिजित थोरात, अनिकेत सुरपल्लीकर, चारूदत्त रंधवे आदींसह अनेक भीम अनुयायी उपस्थित होते. कार्यक्रमात नामदेव सुरपल्लीकर, बालाजी शिंदे व दिनेश कुऱ्हाडे यांनी आंबेडकरांच्या संघर्षमय जीवनप्रवासावर प्रकाश टाकत संविधान निर्मिती, मतदानाचा अधिकार तसेच महिला व कामगारांच्या हक्कांसाठी दिलेल्या योगदानाचा उल्लेख केला. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.



## 'दगडूशेठ' गणपती ट्रस्टतर्फे ४०० ज्येष्ठांना मोफत श्रवणयंत्र

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आणि ॲलिम्को कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने सदाशिव पेठेतील फडके हॉल येथे झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्रातील तब्बल ४०० ज्येष्ठांना श्रवणयंत्र मोल्ड चे वाटप करण्यात आले. महाराष्ट्राच्या विविध शहरांतून तसेच ग्रामीण भागातून हे ज्येष्ठ नागरिक शिबीरासाठी पुण्यात आले होते.




यावेळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सवप्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सुनील रासने म्हणाले, दगडूशेठ गणपती ट्रस्ट व विविध संस्था, कंपन्या यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबीरांचे आयोजन करण्यात येत आहे. केवळ पुण्यातच नाही, तर इतरही शहरातून या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. यावरुनच समाजातील मोठी व्यथा समोर येत असल्याचे दिसून आले आहे. आजच्या कार्यक्रमात ४०० रुग्णांना यंत्र देण्यात आले. ते पुढे म्हणाले, कानाच्या विकारांप्रमाणेच विविध आजार, कृत्रिम आवयक यांसह सर्व प्रकारची वैद्यकीय मदत ट्रस्टच्या माध्यमातून सातत्याने केली जात आहे. जय गणेश रुग्णसेवा अभिनायाच्या माध्यमातून लाखो गरजू रुग्णांना लाभ होत असून समाजाच्या तळागाळात पोहोचण्याचा ट्रस्टचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

## प्री-वेडिंग शूटला 'ब्रेक' खामुंडीतील काळभैरवनाथ मंदिरात चित्रीकरणासाठी शुल्क बंधनकारक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** खामुंडी (ता.जुन्नर) येथील प्रसिद्ध व अत्यंत विलोभनीय आणि निसर्गरम्य परिसराने नटलेल्या श्री काळभैरवनाथ मंदिर परिसरात प्री-वेडिंग चित्रीकरण करणाऱ्यांना आता मोजावे लागणार आहेत थेट दोन हजार रुपये! मंदिराचे पावित्र्य आणि शिस्त अबाधित ठेवण्यासाठी देवस्थान ट्रस्टने हा कडक निर्णय घेतला असून याबाबतची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

श्री काळभैरवनाथ देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्त व पदाधिकाऱ्यांच्या नुकत्याच झालेल्या मासिक बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून मंदिर परिसरात वाढत्या प्री-वेडिंग शूट्समुळे धार्मिक वातावरणाला बाधा येत असल्याची बाब लक्षात घेऊन हे पाऊल उचलण्यात आले आहे.

मंदिराची भव्य व आकर्षक कलाकुसरीने नटलेली वास्तुरचना, निसर्गरम्य परिसर आणि शांत वातावरण यामुळे परिसरातील तसेच बाहेरील अनेक वधू-वर प्री-वेडिंग शूटसाठी येथे गर्दी करत आहेत. मात्र, काही ठिकाणी चित्रीकरणादरम्यान शिस्तभंग आणि पावित्र्याला धक्का बसत असल्याच्या तक्रारीही भाविकांमधून पुढे आल्या होत्या.

याच पार्श्वभूमीवर देवस्थान ट्रस्टने आता स्पष्ट नियमावली लागू केली असून प्री-वेडिंग चित्रीकरणासाठी २००० रुपये शुल्क अनिवार्य केले आहे.त्याबाबत देवस्थानकडून अधिकृत पावती घेणे बंधनकारक असणार आहे, पावती नसल्यास चित्रीकरणास सक्त मनाई करण्यात आली असल्याची माहिती ट्रस्ट प्रशासनाने दिली आहे.

मंदिर हे केवळ पर्यटनस्थळ नसून भाविक भक्तांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. त्याचे पावित्र्य जपणे ही सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळेच हा कडक निर्णय घेण्यात आला आहे.
**देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष संदीप गंभीर व विश्वस्त.**

या संदर्भात देवस्थान ट्रस्टकडून सर्व भाविक आणि नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, मंदिराच्या पावित्र्याचा मान राखत नियमांचे काटेकोर पालन करावे. अन्यथा नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

परवानगीशिवाय शूटिंग करताना आढळल्यास त्वरित थांबविण्यात येणार असून संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे आवश्यक असल्यास स्थानिक पोलिस प्रशासनाची देखील मदत घेण्यात येणार आहे.

देवस्थान ट्रस्टच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत केले जात असून मंदिर परिसरात वाढती गर्दी व गोंधळ यास काही प्रमाणात आळा बसणार आहे,तसेच धार्मिक वातावरणाला निर्माण होणारी बाधा व पावित्र्य राखण्यात पुरेसे यश प्राप्त होणार आहे.

## वनपट्टा धारक शेतकऱ्यांसाठी फार्मर आयडी नोंदणी मोहीम सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्यातील वनपट्टा धारक शेतकऱ्यांसाठी फार्मर आय डी नोंदणी मोहीम सुरू करण्यात आली असून ही नोंदणी राज्यभर नागरी सुविधा केंद्र (उडउ) मार्फत राबविण्यात येत आहे. या नोंदणीसाठी शेतकऱ्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात डिजिटल कृषी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ॲग्रीस्टॅक (असअॅळडींरलज्ञ) योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. शासन निर्णयानुसार कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आय डी नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे.

वनहक्क अधिनियम २००६ अंतर्गत अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी समुदायांना त्यांच्या वनजमिनीवरील हक्क प्रदान करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील वनपट्टा धारक शेतकऱ्यांची फार्मर आय डी नोंदणी करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

वनपट्टा धारक शेतकऱ्यांनी आपल्या जवळील सी एस सी केंद्रात आवश्यक कागदपत्रांसह भेट देऊन तातडीने नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. यामुळे शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ मिळणे अधिक सुलभ होणार आहे.


## अनधिकृत कनेक्शन तोडल्याने सुपेकरांच्या घशाला कोरड

### पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर - मुळा धरणाच्या अधिकृत पाण्याची प्रतीक्षा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सुपा विशाल फटांगडे :** सुपा औद्योगिक वसाहतीसह परिसरात सध्या पाणीटंचाईचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असून, नागरिकांच्या घशाला अक्षरशः कोरड पडली आहे. औद्योगिक महामंडळाच्या पाणीपुरवठा विभागाने अलीकडेच अनधिकृत नळ कनेक्शनवर कारवाई करत १०० पेक्षा अधिक कनेक्शन तोडले आहेत. मात्र, या कारवाईनंतर सामान्य नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न अधिकच तीव्र झाला आहे. सुपा म्हणजे औद्योगिक वसाहतीमुळे गजबजलेली बाजारपेठ आणि हजारो कामगारांचे वास्तव्य असलेला परिसर. मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित कामगार व त्यांची कुटुंबे येथे वास्तव्यास आहेत. मात्र, अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना तीव्र अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ग्रामपंचायतीमार्फत होणारा पाणीपुरवठा आठ दिवसांतून केवळ एकदाच होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. त्यामुळे अनेकांनी गरज भागवण्यासाठी अनधिकृत कनेक्शनचा पर्याय निवडला होता. मात्र ही कनेक्शन तोडल्यामुळे सुमारे ५० टक्के नागरिक पूर्णपणे पाण्याविना झाले आहेत. त्यातच मोठा भाग मुळा धरणाच्या पाण्यापासूनही वंचित असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. सध्या सुपेकरांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत असून, त्यासाठी जादा आर्थिक भार सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी महिलांना व लहान मुलांना दूरवरून पाणी आणावे लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, नागरिकांकडून प्रशासनाकडे अधिकृत पाणीपुरवठ्याची मागणी जोर धरत आहे. अनधिकृत कनेक्शन तोडणे योग्य असले तरी पर्यायी व्यवस्था करणे अत्यावश्यक आहे. अधिकृत नळ कनेक्शन द्यावीत, मीटर बसवावेत आणि नियमित पाणीपुरवठा करावा, अशी ठाम मागणी नागरिकांनी केली आहे.स्थानिकांच्या मते, औद्योगिक वसाहतीसाठी मोठ्या प्रमाणावर पाणी उपलब्ध करून दिले जाते; मात्र त्याच भागातील नागरिकांना मूलभूत गरज असलेले पाणी मिळत नाही, ही बाब अन्यायकारक आहे.

**औद्योगिक महामंडळाच्या पाण्याची मागणी जोरात :**
सुपा येथील नागरिकांनी आता ठाम भूमिका घेत औद्योगिक महामंडळाच्या पाणीपुरवठा योजनेतूनच गावाला पाणी द्यावे, अशी मागणी केली आहे. उद्योगांना पाणी मिळते, तर नागरिकांनाही त्याच योजनेतून पाणी द्यावे, असा ठाम सूर नागरिकांतून उमटत आहे.



सुपा परिसरात दिवसेंदिवस लोकसंख्या झपाट्याने वाढत असून त्यानुसार पाण्याची मागणीही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सध्याचा पाणीपुरवठा अपुरा पडत असून अनेक ठिकाणी नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर औद्योगिक महामंडळाच्या पाणीपुरवठा विभागाकडे अधिक पाण्याची औपचारिक मागणी करण्यात आलेली आहे.

सध्या उपलब्ध स्त्रोतांद्वारे काही प्रमाणात पाणीपुरवठा केला जात असला तरी भविष्यातील वाढती गरज लक्षात घेता मुळा धरणातून अधिकृत पाणीपुरवठा सुरू होणे अत्यावश्यक आहे. नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा मिळावा यासाठी प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. अन्यथा पाणीप्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.
**- मनिषा योगेश रोकडे, प्रशासक, सुपा**

**प्रशासनाची भूमिका काय?**
या प्रकरणी संबंधित विभागाने अद्याप ठोस भूमिका जाहीर केलेली नसून, नागरिकांना लवकर दिलासा मिळेल का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तोडगा न निघाल्यास आंदोलनाचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

**नागरिकांच्या ठाम मागण्या**
अधिकृत नळ कनेक्शन तात्काळ द्यावीत
प्रत्येक घराला मीटर बसवावे
नियमित व पुरेसा पाणीपुरवठा करावौद्योगिक महामंडळाकडून पाणीपुरवठा सुरू करावा
टँकरवरील अवलंबित्वकमी करावे

## डॉ. आंबेडकर यांचे विचार सामाजिक प्रगतीसाठी अंमलात आणणे आवश्यक-राज्यमंत्री माधुरी

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंतीनिमित्त सामजिक न्याय राज्यमंत्र्यांचे महामानवाला अभिवादन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र केवळ घोषणांपुरता मर्यादित न ठेवता, तो प्रत्यक्ष सामाजिक प्रगतीसाठी अंमलात आणणे आवश्यक आहे. आजच्या काळात केवळ स्मारके किंवा फ्लेक्स लावण्यापेक्षा समाजातील तरुण पिढीला, विशेषतः विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आणि उद्योगासाठी प्रत्यक्ष मदत करणे हीच महामानवाला खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केले.

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंतीनिमित्त सामाजिक न्याय भवन, विश्रांतवाडी येथे प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती आणि सहायक आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रम तसेच सामाजिक समता सप्ताहाच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी आमदार बापुसाहेब पठारे, राज्याच्या समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे, विभागाच्या सहआयुक्त (शिक्षण) प्रमोद जाधव, प्रादेशिक उपआयुक्त वंदना कोचुरे, सहायक आयुक्त विशाल लोंढे आदी उपस्थित होते.

श्रीमती मुधोळ-मुंडे म्हणाल्या, क्रांतीसुर्य




महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक समता सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या पुढे म्हणाल्या, महामानवांचे कार्य, त्यांचे विचार, आपल्याकडून अपेक्षित असलेले वर्तवणूक तसेच समाज कल्याण विभागामार्फत विविध योजनांची माहिती दिली.

ी. जाधव यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतक-यांसाठी केलेले कार्य या विषयावर व्याख्यान दिले. श्रीमती कोचुरे यांनी समाज कल्याण कार्यालयाच्या अंतर्गत असणाऱ्या वसतिगृह, निवासी शाळांमध्ये ८ ते १४ एप्रिल २०२४ या कालावधीमध्ये सामाजिक समता सप्ताहानिमित्त घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाबाबत माहिती दिली. श्री. लोंढे यांनी उपस्थित विद्यार्थी व नागरीकांना शुभेच्छा संदेश देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी विचार घेवून जीवनाची वाटचाल यशस्वी करावी, असे आवाहन केले.

यावेळी समाज कल्याण विभागातील विविध अधिकारी व कर्मचारी यांच्यासह शासकीय वसतिगृहातील गृहप्रमुख व गृहपाल तसेच विद्यार्थी-विद्यार्थींनी, नागरिक उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते अॅट्रॉसिटी अंतर्गत प्रकरणातील मयत व्यक्तींच्या १९ वारसांना शासकीय नोकरी प्रदान करण्याबाबतचे आदेश, तसेच स्टँड अप इंडिया, स्वाधार व शिष्यवृत्ती योजनांच्या लाभार्थ्यांचा सन्मान प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमापूर्वी सामजिक न्याय मंत्री माधुरी मिसाळ यांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी पुणे शहराच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपआयुक्त (नियोजन) विजयकुमार गायकवाड, प्रादेशिक उपआयुक्त वंदना कोचुरे, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त रविंद्र कदम पाटील, सहायक आयुक्त विशाल लोंढे, श्री मारकड आदी उपस्थित होते.

## राहुरी बस स्थानकात महामानवाला अभिवादन

**राहुरी :** दरवर्षीप्रमाणे राहुरी बस स्थानकात पत्रकार आप्पासाहेब मकासरे यांच्या मार्गदर्शना खाली महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

यावेळी प्रथम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सजविण्यात आले. आलेल्या सर्व पाहुण्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला फुले अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शिरीष गायकवाड व राजेंद्र वाडेकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनशैली विषयी थोडक्यात मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी पत्रकार आप्पासाहेब मकासरे, राजेंद्र परदेशी, राहुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक तुळशीराम गीते, वाहतूक नियंत्रक श्री बागुल, मधुकर साळवे, पोलीस मित्र आलम शेख यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे यथोचित पूजन करून आलेल्या सर्व बाळ गोपाळ महिला भगिनी,प्रवाशांना व जमलेल्या सर्व नागरिकांना अल्पोपहार देण्यात आला.



द·ख·ल



## सप्तश्रृंगी ग्रंथालय येथे आंबेडकर जयंती साजरी

**ढोरजळगांव** : शेवगांव तालुक्यातील ढोरजळगांवशे येथील सप्तश्रृंगी सार्वजनिक ग्रंथालय येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला चंद्रकांत गि–हे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सप्तश्रृंगी ग्रंथालय अध्यक्ष आसाराम शेळके, उपाध्यक्ष उत्तम पाटेकर, सचिव गोविंद वाणी,डॉ सुधाकर लांडे,प्रशांत खाम कर, ग्रंथपाल बापु माळी आदी उपस्थित होते.

## शहरटाकळी येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



**शहरटाकळी** : शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी येथे विविध ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती चे औचित्य साधून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व धर्म समभाव, न्याय,समता,बंधुता,भारतीय नागरिकांची कर्तव्ये,हक्क सर्वांना मिळवून दिले, समान न्याय मिळावा यासाठी त्यांनी आपले आयुष्य खर्च केले. व त्यानुसार संविधानात सर्वसमावेशक कलमे अंतर्भूत केली. शिका,संघटित व्हा,संघर्ष करा हा मंत्र डॉ आंबेडकर सर्वांना दिला अशा या महामानवाला शहरटाकळी येथे अभिवादन करण्यात आले, या वेळी अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले . यावेळी ग्रा.प. सदस्य युवा नेते संभाजी गवळी, सामाजिक कार्यकर्ते आबासाहेब राऊत , माजी सरपंच अण्णासाहेब शिंदे, भगवानराव खरमाळे ,निकाळजे सर, आत्माराम कुंडकर ,संदीप राऊत, शिवाजीराव खराडे, रामचंद्र गिरमे, संभाजी कोल्हे, कडुबाळ कोल्हे, गणेश कावले , गौरव चव्हाण आदीसह मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले ,पोलीस हे. कॉ. परशुराम नाकाडे व सहकाऱ्यांनी चोक बंदोबस्त ठेवला.

## निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलमध्ये आंबेडकर जयंती साजरी



**ढोरजळगांव** : निर्मल ब्राईट फ्युचर स्कूल शेवगांव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून झाली.

यावेळी शाळेचे प्राचार्य दत्तात्रय मोरे, अॅक्डमी कॉर्डिनेटर बाळू नीळ, श्रीमती संजीवनी वाघमारे, रामा रेवडकर आदी उपस्थित होते. यावेळी प्राचार्य दत्तात्रय मोरे म्हणाले की विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्वतः चा आणि समाजाचा विकास साधावा, असे आवाहन केले. शाळेतील शिक्षक लाजरस बनसोडे, उज्वला घुटे यांनी देखील डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन पैलूंवर प्रकाश टाकला.

## 'संविधानच देशाचे अखंडत्व टिकवू शकते'

**अहिल्यानगर** : आज देशामध्ये परिस्थिती चिघळविण्याचा प्रयत्न काही लोक करीत आहेत. आपल्या राजकीय अजेंड्यासाठी देशाला अस्थिर करण्याचे डाव काही प्रवृत्ती राबवित आहेत. मात्र देशाला स्थिर, एकसंध ठेवण्याची ताकद देशाच्या संविधानामध्ये आहे. महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधानच देशाचे अखंडत्व टिकवू शकते, असे प्रतिपादन अहिल्यानगर शिवसेना ठाकरे पक्षाचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केले आहे. डॉ.आंबेडकर जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार घालून अभिवादन केल्यानंतर त्यांच्या नावाचा जयघोष करण्यात आला. यावेळी काळे यांच्यासह संजय झिंजे, मनोज गुंदेचा, अनिस चुडीवाला, विलास उबाळे, रावजी नांगरे, दीपक भोसले, राम वाणी, राम झिने, अलतमश जरीवाला, रोहन शेलार, चंद्रकांत उजागरे, संतोष घरवाढवे, मतीन शेख, उषाताई भगत, शैलाताई लांडे, शंकर आव्हाड, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, गणेश आपरे, अमोल खाडे, रामभाऊ धोत्रे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. किरण काळे पुढे म्हणाले, डॉ. आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा संदेश समाजाला दिला. शिक्षणाच्या बाबतीत आपण पुढे आलो आहोत. मात्र आज देशामध्ये ज्या पद्धतीने देश तोडण्याच्या कृती सुरू आहेत या कृतींच्या विरोधात लढण्यासाठी त्यांच्या विचारांप्रमाणे संघटित होऊन संघर्ष करण्यासाठी सज्ज होण्याची गरज आहे.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त जिल्हा व मनपा प्रशासनाकडून अभिवादन

# संविधानाच्या विचारांतून समाजाला दिशा : आ. जगताप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा प्रशासन व महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पोलीस बँड पथकाकडून मानवंदना देण्यात आली.

अहिल्यानगर शहर हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असून या ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, अशी मागणी समाज बांधवांकडून करण्यात आली होती. त्यानुसार पाठपुरावा करून या पुतळ्याचे काम पूर्ण करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयातील पुतळ्याच्या धर्तीवर उभारलेला हा पुतळा देशातील दुसरा असून शहरासाठी प्रेरणास्थान ठरत आहे. पूर्णाकृती पुतळा उभारणीनंतरची ही पहिलीच जयंती असल्याने कार्यक्रमाला विशेष उत्साह पाहिला मिळत आहे भारतरत्न



भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज शिकला पाहिजेत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले की सांगितले की समाज शिकला पाहिजेत संघटित झाला पाहिजे संघटित झाला पाहिजे त्या माध्यमातून त्या माध्यमातून समाज समाज प्रगत प्रगत झाला झाला त्यांचे विचार समाजाला त्यांचे विचार समाजाला ऊर्जा व प्रेरणा देणारे ठरले असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले

यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोम नाथ घार्गे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, उपमहापौर अॅड. धनंजय जाधव, जल अभियंता परिमल निकम, सविता मोरे आदींसह सम ाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ज्ञान हे प्रगतीचे शस्त्र आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळेच सर्वसाम ान्यांना हक्क मिळाले असून मी स्वतः महापौर पदापर्यंत पोहोचण्याचे श्रेय संविधानालाच देते. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या त्यांच्या संदेशामुळे समाजाची प्रगती झाली आहे, असे त्या म्हणाल्या.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे म्हणाले की, डॉ. आंबेडकर यांनी घेतलेले शिक्षण, मिळवलेल्या पदव्या आणि त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांतून समाजाला दिशा मिळते. त्यांनी दिलेला संदेश कृतीतून आणि साहित्याद्वारे पुढील पिढीसाठी प्रेरणादायी आहे. जयंती मिरवणुका उत्साहात साजऱ्या कराव्यात, मात्र डीजे, प्लाझा व लेझर लाईटचा वापर टाळून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले कायदे व संविधान हे सर्वांसाठी मार्गदर्शक आहेत. त्यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजासाठी कार्य करणे आवश्यक आहे. प्रशासनाच्या माध्यम ातून हे विचार जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम सुरू आहे. जयंतीनिमित्त सर्वांना शुभेच्छा देत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेतील विद्यार्थ्यांनी संविधानाचे वाचन केले. तसेच पोलीस बँड पथकाच्या वतीने मानवंदना देत कार्यक्रमाला उत्साही वातावरण लाभले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर विषम समाजाला एकसंघ करणारे महामानव : डॉ. सोपान नवथर



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव** : जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे, मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय,अहिल्यानगर येथील राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभागाच्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.के.पंदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते व मार्गदर्शक म्हणून न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव (इतिहास विभाग) येथील प्रा.डॉ.सोपान नवथर बोलत होते.ते म्हणाले की,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक आणि धार्मिक विषमतेने विभागलेल्या भारतीय समाजाला संविधानाच्या माध्यमातून एका समान पातळीवर आणण्याचे ऐतिहासिक कार्य केले.

प्रास्ताविक कला शाखा व इतिहास विभाग प्रमुख प्रा.एस.व्ही.मरकड यांनी केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. पी.ए.फटांगरे हे होते. उपप्राचार्य डॉ.के.आर. पिसाळ यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त त्यांचे विचार व कार्य तरुणांसाठी प्रेरणादायी याविषयी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी प्रा.राहुल ताके (इंग्रजी विभाग)संशोधन केंद्र,न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज,आहिल्यानगर उपप्राचार्य प्रा. डॉ. के. आर. पिसाळ, उपप्राचार्य प्रा. पी. ए. फटांगरे, कला शाखाप्रमुख प्रा. एस. व्ही. मरकड, प्रा. डॉ. एस. बी. दहातोंडे, प्रा. व्ही. डब्ल्यू. गोडसे, प्रा. ए. के. आहेर प्रा.एफ.बी.खान,परीक्षा विभाग प्रमुख डॉ.आर.ए.नेटके, संगणक विभाग प्रमुख डॉ.ए.आय.शेख, ग्रंथपाल प्रा.स्नेहा निमसे,प्रा.के.एस.कराड,प्रा.एस.एस. पुंड,कार्यालय अधीक्षक श्री.पी.व्ही. दळवी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्यामा वाळके,अल्तमश शेख,ऋतिक ताकपेरे,स्वयंसेवक विद्यार्थी प्रतिनिधी शुभम ताजणे,अश्विनी आंधळे व इतर स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.के. आर.पिसाळ यांनी केले, तर आभार इतिहास विभागातील प्रा.डी.जी.गदादे यांनी मानले.या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाठ्यपुस्तकातून मराठा साम्राज्याचा नकाशा वगळल्याने संताप; तातडीने दुरुस्तीची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर :** राज्यातील शालेय पाठ्यपुस्तकांमधून मराठा साम्राज्याचा नकाशा वगळण्यात आल्याच्या निर्णयावरून विविध सामाजिक संघटना व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. इतिहासातील हा महत्त्वपूर्ण भाग गाळण्याचा प्रयत्न म्हणजे मराठ्यांच्या गौरवशाली परंपरेचा अवमान असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

मराठा साम्राज्य हे केवळ राज्य विस्ताराचे प्रतीक नसून देशाच्या संरक्षणासाठी उभ्या राहिलेल्या पराक्रमाचा इतिहास आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली उभारलेले स्वराज्य आणि पुढे वाढलेले मराठा साम्राज्य भारतीय इतिहासातील एक अभिमानास्पद पर्व मानले जाते.

अशा परिस्थितीत त्याचा नकाशा पाठ्यपुस्तकातून हटविणे हा इतिहास पुसण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

स्थानिक पातळीवर विविध संघटनांनी या निर्णयाचा निषेध करत शासनाने त्वरित दुरुस्ती करून मराठा साम्राज्याचा नकाशा पुन्हा पाठ्यपुस्तकात समाविष्ट करावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा व्यापक आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

इतिहास विषयातील अभ्यासकांच्या मते, विद्यार्थ्यांना संपूर्ण आणि वस्तुनिष्ठ इतिहासाची माहिती मिळणे अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव इतिहासातील महत्त्वाचे घटक वगळणे ही शैक्षणिक दृष्टीनेही चुकीची बाब ठरू शकते. दरम्यान, संबंधित विभागाने याबाबत स्पष्टीकरण देऊन योग्य ती दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत असून, या प्रकरणाकडे राज्यभर लक्ष लागले आहे.

## हातगावात ठिकठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**हातगाव** : शेवगाव तालुक्यातील हातगाव येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती हातगाव ग्रामपंचायतीसह श्री रामेश्वरदासजी विद्यालय, पैठण – पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील महामानव डॉ आंबेडकर चौक,जिल्हा परिषद शाळेत व महाराणा प्रताप मंडळाच्या वतीने जयंती सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला आहे. ग्रामपंचायत कार्यालयात प्रा. भाऊसाहेब मुरकुटे व माणिक खंडागळे यांच्या हस्ते आंबेडकरांच्या प्रतिमेस हार अर्पण करण्यात आला आहे तर डॉ. आंबेडकर चौकात प्रदीप देवणे यांनी उपस्थित असणाऱ्या सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले श्री रामेश्वरदासजी विद्यालयात पत्रकार रावसाहेब निकाळजे व विद्यालयाचे मुख्याध्यापक गोरक्ष सातपुते यांचे शुभ हस्ते अभिवादन करण्यात आले आहे.या वेळी शिक्षक बाळासाहेब कोकरे, सतिष सुपारे, राहुल ज्योतिक,धनंजय वैद्य, बापूसाहेब वाघमारे हे उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेतील आवारातील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, समाज कल्याण अधिकारी देविदास कोकाटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, शाखा अभियंता एच.एम काकडे . आदींसह अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार म्हणून बाबासाहेबांचं या देशासाठी दिलेलं योगदान अतुलनीयच आहे आणि या देशाच्या येणाऱ्या पिढ्या त्याबद्दल त्यांच्या ऋणात राहतील.संविधानातील 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता' या तीन मूलभूत मूल्यांवर विशेष भर दिला.

ही मूल्येच आधुनिक भारताचा पाया असल्याचे त्यांनी नमूद केले.

संविधान निर्मितीसाठी २ वर्ष ११ महिने १८ दिवस लागले असे सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार केवळ पुस्तकात न ठेवता ते दैनंदिन प्रशासकीय कामात आणि वर्तनात आणावेत असे आवाहन करून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंती निमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

# जातिव्यवस्था निर्मूलनासाठी शिक्षणात आमूलाग्र बदलाची मागणी

### आंबेडकर जयंतीनिमित्त 'रिकॉन्शिओ शिक्षण' लागू करण्यासाठीची हाक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**अहिल्यानगर** : जातिव्यवस्था, अंधश्रद्धा, स्त्री दास्य व भोंदूगिरी ,मतदास्य यांचे समाजातून कायमस्वरूपी उच्चाटन करण्यासाठी शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची मागणी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसद यांच्या वतीने करण्यात आली आहे. इयत्ता ४ थी ते १२ वीच्या शिक्षणात 'रिकॉन्शिओ शासनाद्वारे अजनुकीय माहिती सुधारणा' हा विषय अनिवार्य करण्यासाठी राष्ट्रव्यापी स्तरावर ही मागणी करण्यात आली.

भारताच्या सामाजिक परिवर्तनाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त हुतात्मा स्मारक येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी जात व धर्म हटाव, देश बचाव अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी ड. कारभारी गवळी, ड. अमित थोरात, ड. लक्ष्मण पोकळे, प्रकाश थोरात, अशोक सब्बन, प्रकाश गोसावी, प्रतीक म्हस्के, वीर बहादुर प्रजापती, पोपट भोसले, अशोक भोसले, रमा आढाव, आनंदा आढाव, संजय शेकडे, शाहीर कान्हू सुंबे, बाजीराव गव्हाणे, लखन साळवे आदी उपस्थित होते.

संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, जातिव्यवस्था ही सुमारे २५०० वर्षांपासून भारतीय समाजात खोलवर रुजलेली आहे. तिचे उच्चाटन करण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसून दीर्घकालीन, शास्त्रशुद्ध व सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. इयत्ता ४ थी ते १२ वी हा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाचा सुवर्णकाळ असून, या टप्प्यावर 'रिकॉन्शिओ शिक्षण' दिल्यास पुढील पिढीला जातिव्यवस्था व अंधश्रद्धेपासून मुक्त करता येऊ शकते, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

अॅड. कारभारी गवळी म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला संविधान दिले आणि जाती निर्मूलनाचा स्पष्ट मार्ग दाखवला. मात्र संविधानाची अंमलबजावणी होऊनही जातिव्यवस्था, अंधश्रद्धा, भोंदूगिरी, दैववाद, स्त्रीदास्य आणि मतदास्य या सामाजिक व्याधी आजही समाजात जिवंत आहेत. याचे मूळ कारण म्हणजे माणसाच्या मेंदूत खोलवर रुजलेली अजनुकीय माहिती. कायदा माणसाचे वर्तन बदलू शकतो, परंतु मनातील संस्कार बदलण्यासाठी शिक्षणपद्धतीत बदल करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे 'रिकॉन्शिओ शासन' आणि समन्वित ज्ञान सिद्धांत यांचा आधार घेऊन शिक्षणात क्रांतिकारी बदल घडवणे गरजेचे आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य जगात महान : आ. दाते

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान तयार करून भारताची शान जगात केली असून त्यांचे कार्य जगात महान असल्याचे प्रतिपादन आमदार काशिनाथ दाते सर यांनी व्यक्त केले आहे. निघोज येथे मंगळवार दि.१४ रोजी त्रिरत्न बुद्ध विहार परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृती संघ मुंबई व निघोज यांच्या वतीने महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी आमदार दाते सर बोलत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृती संघाचे अध्यक्ष सुभाष सोनवणे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.



सर्वप्रथम आमदार दाते सर तसेच मान्यवरांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करीत पुष्पहार अर्पण केला. यावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य शंकरराव नगरे, सरपंच चित्राताई वराळ पाटील, चोंभूतच्या सरपंच कांचनताई म्हस्के, अळकुटीच्या सरपंच कोमलताई भंडारी, राळेगण थेरपाळचे सरपंच पंकज कारखिले, वडनेरचे सरपंच राहुल सुकाळे, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे , राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीच्या जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद, बापुसाहेब गावडे महाविद्यालयाचे प्राचार्य वाघमारे सर, मुलिका देवी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक इनामदार सर, बापुसाहेब गावडे विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक गायकवाड सर, आंबेडकर स्मृती संघाचे उपाध्यक्ष दिनेश सोनवणे,

युवा नेते दत्तात्रय म्हस्के, नाशिक येथील पी एस आय प्रियंका शेटे, ग्रामपंचायत सदस्य सतिष साळवे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त विठ्ठलराव कवाद, रोहिदास लामखडे, पैलवान सुभाष वराळ, स्वप्नील आतकर, आपला गणपती सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष रविशेठ रणसिंग, आपला तालुका न्यूज चॅनलचे संपादक जयसिंग हरेल, पसायदान सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र सुपेकर, पारनेर तालुका बार्टी समतादूत सुलतान सय्यद, युवा नेतृत्व अजित सोनवणे , राहुल वाघमारे आदी परिसरातील ग्राम स्थ व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार दाते सर यावेळी म्हणाले भारतीय संविधान जगात एक नंबर आहे. ते बदलण्याचे धाडस कुणीही करणार नाही एवढी ताकद त्या संवीधनात आहे. भारतीय लोकशाही जगात नंबर एकच आहे. संवीधनाच्या माध्यमातून डॉ.आंबेडकर यांनी सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचे काम केले आहे. महिला भगीनींना सर्वाधिक अधिकार संवीधान माध्यमातून मिळाला आहे. आपण कुरुंद येथील आंबेडकर नगर येथील विकासकामांसाठी २५ लाख रुपये, चोंभूत येथे प्रणव भालेराव व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मागणीनुसार २० लाख रुपये तसेच येथील बुद्ध विहार परिसरात सभागृह व जिमचे साहित्य लवकरच उपलब्ध करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली आहे. निघोज व परिसरातील गावांतील जवळपास दहा ते बारा गावचे सरपंच, उपसरपंच व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मान्यवरांना संवीधानाची प्रत देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.्तसेच निघोज येथील ज्येष्ठ मंडळी व माता भगीणींचा सत्कार आंबेडकर स्मृती संघाच्या वतीने माजी पंचायत समितीचे माजी सदस्य शंकरराव नगरे, अध्यक्ष सुभाष सोनवणे , ज्येष्ठ मार्गदर्शक बबनराव सोनवणे, सोसायटीचे उपाध्यक्ष हिरामण सोनवणे, सचिव दिलीप सोनवणे तसेच आंबेडकर स्मृती संघाचे पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला.्तसेच या कार्यक्रमात ज्या बालचमूंनी व महिला भगीनी यांनी उत्कृष्ट भाषने केली त्यांचा सत्कार सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निघोज सोसायटीचे उपाध्यक्ष हिरामण सोनवणे यांनी केले.शेवटी ज्येष्ठ मार्गदर्शक बबनराव सोनवणे सर व सचिव दिलीप सोनवणे यांनी आभार मानले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

बुधवार, दि.१५ एप्रिल २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## श्रीरामपूरात गोवंशीय जनावरे घेऊन जाणारा टेम्पो पकडला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातून गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी वाहतूक केल्याच्या संशयावरून पोलिसांनी टेम्पो पकडून जर्शी गाय व दोन वासरांसह एकूण २ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. श्रीरामपूर पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार वॉर्ड क्रमांक २ कडे जाणाऱ्या टेम्पोतून गोवंशीय जनावरे नेली जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून सदर टेम्पो अडवला. तपासणीदरम्यान टेम्पोत २० हजार रुपये किंमतीची जर्शी गाय तसेच प्रत्येकी ४ हजार रुपये किंमतीची दोन वासरे आढळून आली. पोलिसांनी २ लाख रुपये किंमतीचा टेम्पो व जनावरे असा एकूण २ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीत विकृतपणा

## डीजे वर व्यक्तिगत गीते वाजवल्याने संगमनेर मधून तीव्र निषेध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : जगाला समतेचा व मानवतेचा मंत्र देणारे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने मोठ्या उत्साहाने अभिवादन सुरू असताना महायुतीच्या कार्यकर्त्यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर व्यक्तिगत आणि उडत्या चालीचे गीते वाजून चालू कार्यक्रमात गोंधळ निर्माण केल्याने या विकृत प्रवृत्ती विरोधात संगमनेर तालुक्यांमधून तीव्र संताप आणि निषेध सुरू झाला आहे.



महायुतीच्या डीजे वाजवणाऱ्यांवर आणि पोलीस प्रशासनावर आमदार सत्यजित तांबे यावेळी चांगले संतापले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानच्या वतीने व्याख्यान व जीवनगौरव पुरस्कार सुरू असताना महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मुद्दाम गोंधळ निर्माण व्हावा यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर काही व्यक्तिगत व उडत्या चालीची गीते सुरू केली. अत्यंत शांततेमध्ये सुरू असलेल्या कार्यक्रमांमध्ये वारंवार अडथळा निर्माण करण्याचे काम महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून सुरू होते. डीजे चा आवाज वाढवला जात होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ही सर्व गाणी अत्यंत अशोभनीय होती.

यावर वारंवार सूचना करूनही या कार्यकर्त्यांनी ऐकले नाही. यावेळी व्यासपीठावरून आमदार सत्यजित तांबे चांगलेच संतापले. पोलीस प्रशासन काय करते आहे. महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याचे विचार सांगण्याचे काम सुरू असताना काही लोक मुद्दाम होऊन अडथळे निर्माण करत आहेत. आम्ही ४० वर्ष जयंती मोठ्या आनंदाने सर्वांना घेऊन साजरी करत आहोत. हे कधी कुठे होते का ? असा सवाल करताना असे वर्तन अत्यंत चुकीचे आहे.तातडीने डीजे बंद करा अशा सूचना त्यांनी पोलिसांना दिल्या. यानंतर प्रांताधिकारी, तहसीलदार यांसह पोलीस त्या ठिकाणी हजर झाले. काही काळ डीजे बंद केल्यानंतर पुन्हा डीजे सुरू करण्यात आला. यानंतर मात्र वंचित बहुजन आघाडीच्या राज्य प्रवक्त्या उत्कर्षाताई रुपवते व ज्येष्ठ कार्यकर्त्या कुसुमताई माघाडे डीजे सुरू असलेल्या ठिकाणी आल्या आणि चांगल्या संतापल्या. चालू कार्यक्रमांमध्ये धुडगूस घालण्याचा तुमचा उद्देश आहे. हे वर्तन अत्यंत बेशिस्त आहे. अशी पद्धत संगमनेर मध्ये कधीच नव्हती. हे घाणेरडे प्रकार तुम्ही सुरू केले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी ज्येष्ठ महिला कार्यकर्त्या माघाडे ताई यांना अत्यंत उद्धट उत्तरे दिली. त्यामुळे त्या ठिकाणी उपस्थित असलेले सर्व प्रतिष्ठानचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले. काही काळ मोठे तणावाचे वातावरण निर्माण झाले. सर्व रस्ते ट्रॅफिक जाम झाले. या ठिकाणी झालेल्या गोंधळामुळे प्रशासनाची ही तारांबळ उडाली. हा प्रकार म्हणजे म्हातारी मेल्याचे दुःख नव्हे तर काळ सोकावतो आहे अशी प्रतिक्रिया उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली असून या घटनेचा संगमनेर तालुक्यासह राज्यभरातून तीव्र निषेध होत आहे.

## श्रीरामपूरच्या निशाणेबाजांची राज्यस्तरावर चमक

### चार खेळाडू प्री-नॅशनलसाठी पात्र

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**श्रीरामपूर** : महाराष्ट्र रायफल असोसिएशनतर्फे छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय महाराष्ट्र एअर गन स्पर्धा २०२६ मध्ये श्रीरामपूरच्या द अल्टिमेट स्पोर्ट शूटिंग अकॅडमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत प्री-नॅशनल स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. या स्पर्धेत आरणा प्रितेश कुंकूलोळ (१० मीटर पिप साइट रायफल) हिने सब-यूथ व यूथ गटातून पात्रता मिळवली. प्रीशा प्रितेश कुंकूलोळ (१० मीटर एअर पिस्टोल) हिने सब-यूथ, यूथ व ज्युनियर गटात उत्कृष्ट कामगिरी केली. अवनी सागर तलवार हिनेही तीन गटांत यश मिळवले, तर पायल सागर तलवार यांनी सीनियर गटातून प्री-नॅशनलसाठी पात्रता निश्चित केली. तसेच आर्या राहुल राऊत, प्रणव कैलास अघाव व विराज वैभव शित्रे यांनी ओपन साइट रायफल प्रकारात उत्कृष्ट प्रदर्शन करत लक्ष वेधले. या सर्व खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावरील निशाणेबाज केतन विजय वाघ यांचे मार्गदर्शन लाभत आहे. अल्पावधीतच मिळवलेल्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत असून विजेत्यांचे मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## साक्षी धोनी यांचे साई दर्शन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : चेन्नई सुपर किंग्स संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीची पत्नी साक्षी धोनी आणि मुलगी झिवा यांनी शिर्डीत येऊन साई समाधीचं दर्शन घेतले. यावेळी त्यांनी साईबाबांच्या माध्यान्ह आरतीला हजेरी लावली.

साईबाबांच्या दर्शनानंतर साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आणि उपकार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांनी साक्षी धोनी यांचा साईबाबांची मूर्ती आणि शाल देऊन सत्कार केला. यावेळी शिर्डीतील नगरसेवक दीपक गोंदकर उपस्थित होते.

यावेळी साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आणि नगरसेवक दीपक गोंदकर यांनी आपण महेंद्रसिंग धोनी यांना शिर्डीला दर्शनासाठी कधी घेऊन येणार? असं विचारले असता. साक्षी यांनी सांगितलं की साईबाबांचं बोलावणे आल्याशिवाय कोणीही त्यांच्या दर्शनासाठी येऊ शकत नाही. महेंद्रसिंग धोनीला जेव्हा साईबाबांचं बोलावणं येईल तेव्हा नक्कीच शिर्डीला येतील असे त्या म्हणाल्या.

## भारत पेट्रोलियम-साईबाबा संस्थान करार

### सौर ऊर्जेतून वीज निर्मितीला गती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : श्री साईबाबा संस्थानने पर्यावरणपूरक 'हरित ऊर्जा' वापर वाढविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) यांच्यासोबत सामंजस्य करार केला आहे. या कराराअंतर्गत संस्थानच्या विविध इमारतींच्या छतांवर १७०९.९२ केडब्ल्यूपी क्षमतेचा ग्रीड-कनेक्टेड रूफटॉप सोलर पीव्ही प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी बीपीसीएलकडून सीएसआर निधीतून सुमारे ४ कोटी ४५ लाख रुपयांची मदत मिळणार असून उर्वरित खर्च संस्थान उचलणार आहे. करारावेळी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.



बीपीसीएल फाउंडेशनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही यावेळी उपस्थिती होती. शिर्डी येथे दररोज देश-विदेशातून हजारो भाविक येत असल्याने मंदिर परिसर, रुग्णालये व पाणीपुरवठा यासाठी अखंड वीजपुरवठा आवश्यक ठरतो. वाढत्या गरजांच्या पार्श्वभूमीवर संस्थान ऊर्जा स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करत आहे. यापूर्वी सुपा येथील पवनचक्की प्रकल्पातून 'कॅप्टिव्ह ओपन ॲक्सेस'द्वारे वीज वापरात आणण्यात आली असून दोन वर्षांत सुमारे ५.६४ कोटी रुपयांची बचत झाली आहे. दरम्यान, एप्रिल २०२६ अखेर १.२ मेगावॅट सौर प्रकल्प कार्यान्वित होणार असून त्यातून दरवर्षी १८ लाख युनिट वीज निर्मिती अपेक्षित आहे.

तसेच नव्या १.७ मेगावॅट प्रकल्पातून २६ लाख युनिट वीज निर्मिती होणार आहे. प्रस्तावित प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर संस्थान सुमारे ७.३ मेगावॅट हरित ऊर्जा निर्माण करून लवकरच वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळणार असून साईबाबा संस्थान हरित ऊर्जा वापरात आदर्श ठरणार आहे.

# अवजड वाहनाची विजेच्या खांबाला धडक; ट्रांसफार्मर जळून खाक !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी फॅक्टरी येथे प्रसादनगर भागात एका अवजड वाहनाने महावितरणच्या पोलला जोरदार धडक दिली. त्यात महावितरणचा एक सिमेंटचा पोल, विद्युत वाहिन्या तुटल्या. २०० केव्हीए क्षमतेचे एक ट्रांसफार्मर जळून खाक झाले. महावितरणचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. या घटनेला तीन दिवस उलटले. परंतु महावितरण तर्फे संबंधित अवजड वाहनावर गुन्हा दाखल झाला नाही. त्यामुळे या वाहनाला क्लीनचिट दिली काय? अशी शंका उपस्थित केली जात आहे. राहुरी फॅक्टरी येथे शनिवारी (ता. ११) रात्री नऊ वाजता ताहाराबाद रस्त्यावरील प्रसादनगर भागातील एका विद्युत पोलला एका अवजड वाहनाने जोरदार धडक दिली होती. त्यात विजेचा पोल तुटून एका घरावर पडला होता. त्यामुळे घराच्या भिंतीचे नुकसान झाले होते.

एका दुचाकीचे नुकसान झाले होते. पोलवरील विद्युत वाहिन्या तुटून जमिनीवर आल्या होत्या. पोल जवळील



२०० केव्हीए क्षमतेचा एक मोठा ट्रांसफार्मर जळून खाक झाला होता. नशीब बलवत्तर म्हणून जीवितहानी झाली नव्हती. या घटनेनंतर प्रसादनगर, गुरुकुल वसाहत व समर्थ नगर या तीन मोठ्या वसाहतींमध्ये वीजपुरवठा खंडित झाला होता.

घटनेच्या दिवशी शनिवारी रात्री, दुसऱ्या दिवशी रविवारी दिवसभर व रात्रभर, तसेच तिसऱ्या दिवशी सोमवारी दिवसभर वीजपुरवठा खंडित राहिला. काल सोमवारी रात्री १० वाजता वीजपुरवठा सुरळीत झाला. त्यामुळे या तीन मोठ्या वसाहतींमधील नागरिकांना तीन दिवस अंधारात राहावे लागले. वसाहतींमधील हजारो नागरिक, लहान मुले, आजारी रुग्ण, वृद्ध महिला व पुरुष यांना वीज पुरवठा नसल्याने भरधाव वाहन चालकाने अपघात करून वेठीस धरले. या घटनेत महावितरणची लाखो रुपयांचे नुकसान झाले.

महावितरणला नवीन सिमेंटचा पोल, नवीन वीजवाहिन्या, २०० केव्हीए क्षमतेचा नवीन ट्रांसफार्मर बसवावा लागला. एवढे नुकसान होऊन तीन दिवस उलटले तरी अपघात केलेल्या अवजड वाहनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला नाही. याबाबत महावितरणचे राहुरी फॅक्टरी येथील प्रभारी विद्युत अभियंता अहिरे यांनी पत्रकारांशी बोलतांना उडवाउडवीची उत्तरे दिली. वरिष्ठांनी सांगितल्याशिवाय गुन्हा दाखल केला जाणार नाही.

आम्ही आमच्या पद्धतीने कारवाई करू, असे सांगून अपघात केलेल्या अवजड वाहन मालक व चालकाला पाठीशी घातले. त्यामुळे त्यांनी अवजड वाहन चालकाकडून काही चिरीमिरी घेऊन क्लीनचीट दिली आहे काय? अशी चर्चा सुरू झाली आहे.

# शासनाच्या लाभदायी योजना शेतकऱ्यांच्या मुळावर

## कुटुंबापुरतेच पिकवायचे हा शेतकऱ्यांसमोर उरला पर्याय

**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : मोफत रेशन, 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत मिळणारी मदत, 'पंतप्रधान किसान निधी ' शासनाकडून मिळणाऱ्या या व अशा इतर अनेक लाभदायी योजनांमुळे ग्रामीण भागातील शेती आता ओस पडू लागली आहे. शेतमजुरांअभावी शेती करताना शेतकऱ्यांच्या नाकी नऊ येत आहे.

ग्रामीण भागात सध्या शेतीकामांसाठी मजूर मिळणे हे मोठे आव्हान बनले असून बहुसंख्य शेतकऱ्यांसमोर हा प्रश्न दिवसेंदिवस अत्यंत गंभीर बनत चालला आहे. शेतातील लहान-मोठी कामे मजुरांअभावी रखडत असल्याने शेतीची कामे वेळेत पूर्ण होत नाहीत आणि उत्पादनावर त्याचा परिणाम होत आहे. परिणामी, शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. काही कामे यांत्रिकीकरणामुळे पूर्ण होत असली तरी इतर काही कामे ही मजुरांच्याच हाताने करून घ्यावी लागतात. ग्रामीण भागातील मजूर शहरांकडे तसेच इतर उद्योगधंद्यांकडे वळत असल्यामुळे ही समस्या अधिक तीव्र होत चालली आहे. मजुरांच्या कमतरतेमुळे शेतीच्या पारंपरिक पद्धतीवर परिणाम होत असून शेतकऱ्यांच्या मानसिकतेतही बदल दिसून येत आहे.

कुटुंबापुरतेच पिकवायचे असा विचार काही शेतकरी करू लागले असून त्यामुळे उत्पादनात घट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. भविष्यात बाजारात दर चांगले मिळाले तरी विक्रीसाठी पुरेसा माल उपलब्ध नसेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. लहान शेतकरीही या परिस्थितीत मोठ्या अडचणीत सापडले आहेत. दरम्यान, या समस्येमागे काही सरकारी योजनांचा अप्रत्यक्ष परिणाम होत असल्याचे मत शेतकऱ्यांकडून व्यक्त केले जात आहे. मोफत रेशन, 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत मिळणारी मदत, 'पंतप्रधान किसान निधी' तसेच ज्येष्ठ नागरिकांना मिळणारी आर्थिक मदत यामुळे काही प्रमाणात श्रमाशिवाय उत्पन्न मिळत असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे काही मजूर शेतीकामाकडे वळण्यास कमी उत्सुक असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे.

घरबसल्या किमान खर्च भागत असल्याने मजूर शेतीकामाकडे पाठ फिरवत आहेत, असल्याचे विदारक चित्र आहे. मजुरांच्या टंचाईमुळे शेती खर्चातही वाढ होत असून उत्पादन टिकवणे अवघड बनत आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. शेतीसाठी मजूर उपलब्ध व्हावेत यासाठी ठोस धोरण, प्रोत्साहनपर उपाययोजना आणि यंत्रिकीकरणाला चालना देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# श्रीरामपूरचे गतवैभव प्राप्त करण्यासाठी जिल्हा घोषित होणे महत्त्वाचे : काळे



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्याला पुन्हा वैभवाचे दिवस आणायचे असतील, तर या शहराला 'जिल्हा' घोषित करणे ही काळाची गरज आहे.

ज्यावेळी धर्मसत्ता आणि राज्यसत्ता एकत्र येते, तेव्हाच खऱ्या अर्थाने अर्थसत्ता आणि विकास प्राप्त होतो, असे प्रतिपादन उद्योजक बाबासाहेब काळे पाटील यांनी केले. श्रीरामपूर येथील थत्ते मैदानावर आयोजित विराट हिंदू संमेलनाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. या ऐतिहासिक संमेलनाला श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास (अयोध्या) चे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज, सराला बेटाचे महंत रामगिरी महाराज, आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्र संघचालक डॉ. जयंतीभाई भाडेसिया यांची प्रमुख उपस्थिती होती.

हिंदुत्वाच्या गंगेतला मी एक बिंदू: स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज संमेलनाचे विशेष आकर्षण ठरलेले स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांनी आपल्या ओघवत्या भाषणात राष्ट्रभक्तीचा मंत्र दिला. या संमेलनासाठी संपूर्ण जिल्ह्यातून वारकरी संप्रदाय, विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक आणि हिंदुत्ववादी कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

थत्ते मैदान भगवेमय झाले होते. प्रभू श्रीराम आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयघोषाने संपूर्ण श्रीरामपूर शहर दुमदुमून गेले होते.

### श्रीरामपूर जिल्हा व्हावा ही आर्त हाक

अध्यक्षीय भाषणात बाबासाहेब काळे यांनी श्रीरामपूरच्या आर्थिक प्रश्नांकडे लक्ष वेधले. ते म्हणाले की, पूर्वी येथे कारखानदारीमुळे समृद्धी होती, मात्र आज केवळ एमआयडीसीवर मदार आहे. डॉ. जयंतीभाई आपण केंद्र आणि राज्य सरकारचे 'राजदूत' म्हणून काम करावे. आमची ही जिल्ह्याची मागणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्यापर्यंत पोहोचवावी. महंत रामगिरी महाराजांच्या माध्यमातून आणि सरकारच्या सहकार्याने श्रीरामपूर जिल्हा झालाच पाहिजे, हा आमचा हट्ट आहे, असे त्यांनी भावूकपणे मांडले.

# विहिरीत पडलेल्या बिबट्याला वनविभागाकडून जीवदान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील टाकळीमियाँ येथे एका शेतकऱ्याच्या विहिरीत पडलेल्या जिवंत बिबट्याला वन विभागाने तत्परतेने कार्यवाही करून सुखरूप बाहेर काढण्यात यश मिळवले. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

राहुरी तालुक्यातील टाकळीमिया येथील शेतकरी पांडु माळवे यांच्या शेतातील विहिरीत बिबट्या पडल्याचे दि. १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी निदर्शनास आले. ही बाब लक्षात येताच माळवे यांनी आसपासच्या शेतकऱ्यांना माहिती दिली. बिबट्या जिवंत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर तात्काळ वन विभागाला कळविण्यात आले. माहिती मिळताच वन क्षेत्रपाल ज्ञानेश्वर साळुंखे यांनी तात्काळ घटनास्थळी पथक रवाना केले. या पथकात वनपाल बाळू आटोळे, संदीप कोरके, वन रक्षक निलेश जाधव, महेश ससे तसेच वन कर्मचारी प्रदीप कोहाकडे, अली इनामदार, शशिकांत मोरे आणि वाहन चालक ताराचंद गायकवाड यांचा समावेश होता.

वन विभागाच्या पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने बचाव कार्य राबवून बिबट्याला कोणतीही इजा न होता अलगद बाहेर काढले. त्यानंतर त्याला पिंजऱ्यात सुरक्षितपणे कैद करून पुढील कार्यवाहीसाठी घेऊन जाण्यात आले. दरम्यान यापूर्वीही माळवे यांच्या वस्तीवर बिबट्याने कालवड व शेळीचा फडशा पाडल्याच्या घटना घडल्या होत्या. त्यामुळे हा बिबट्या शिकारीच्या शोधात असताना विहिरीत पडल्याचा अंदाज स्थानिक शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. बिबट्याला पकडण्यात यश आले असले तरी परिसरात अद्यापही भीतीचे वातावरण कायम असून, नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.